मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ०८ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • ऑगस्ट-२०२३



# हसती दुनिया
(मराठी)

अंक ०८ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • ऑगस्ट-२०२३

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे • राजनंदन कृ. पिंपळकर
श्रीकांत द. पाटील • रोहित कि. खुडे

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : hduniya.marathi@nirankari.org
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

सदस्यता शुल्क

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष |
|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २०
- कुतूहल २४
- दिव्यवाणी २५
- हसा मुलांनो हसा ३०
- आरोग्याचा मंत्र ३६
- सामान्य ज्ञान ४७
- रंग भरा ५०


## चित्रकथा


- चित्रकथा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष : मार्क झुकेरबर्ग ०७
- दिनविशेष : हिरोशिमा दिवस ०८
- विशेष : भारतीय स्वातंत्र्य.... १५
- संतकथा : शांतिब्रह्म-संत एकनाथ २१
- भ्रमंती : सोलापूरचा भुईकोट किल्ला २८
- प्रेरक प्रसंग : नामजपाचे महत्त्व ३५
- विशेष : क्रीडा पुरस्कार ४२
- विशेष : आता चंद्रावर सेल्युलर.. ४६
- अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध.. ४८







## कथा


- श्रीरामांची उदात्त विचारसरणी ०५
- मैत्रीचा अंत ०९
- वस्तूचे मोल २२
- बोलण्याची पध्दत २६
- गुरुआज्ञेचं महत्त्व ३२
- बेनेफिट ऑफ डाऊट ४४








## कविता


- गौरव देशाचा वाढत जावो १२
- शेतकऱ्याचं पोर २७
- रक्षाबंधन ३४
- सांगा बाळांनो.... ४३

# असंही एक रक्षाबंधन

अलाहाबादमध्ये घडलेली ही घटना आहे. रात्रीची वेळ होती. एका झोपडीवजा घराच्या दारावर टकटक आवाज आला. घरामध्ये मायलेकी दोघीच होत्या. मातेनं हळूच दार उघडून पाहिलं तर दारामध्ये एक धष्टपुष्ट, पिळदार मिशा असलेली व्यक्ती उभी. त्या मातेच्या चेहऱ्यावरचे भीतीचे भाव पाहून ती व्यक्ती म्हणाली, “माते भिऊ नकोस. मी एक क्रांतिकारक आहे. माझ्यामागे इंग्रज शिपाई लागले आहेत. फक्त काही तास मी इथं राहीन. माझ्यापासून तुम्हाला काही त्रास होणार नाही.” त्या मातेनं क्रांतिकारकाला घरात घेतलं आणि दरवाजा लावून दिव्याची वात कमी केली. मग विचारपूस सुरु झाली. त्यावर ती माता रडू लागली. म्हणाली, “काय सांगू पोरा, मुलगी उपवर झाली; पण लग्नासाठी चार पैसेही गाठीला नाहीत.” त्या क्रांतिकारकाच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. तो म्हणाला, “माते काळजी करु नकोस. मी हिचा भाऊ आहे. माझंही कर्तव्य आहे. सरकारने मला पकडून देणाऱ्यास पाच हजाराचं बक्षीस जाहीर केलं आहे. तू मला इंग्रजांच्या ताब्यात दे आणि पाच हजाराचं बक्षीस घेऊन मुलीचं लग्न लावून दे.” त्यावर ती माता म्हणाली, “पोरा नको रे असं अभद्र बोलूस. कोण बळी देईल तुझ्यासारख्या भारतमातेच्या सुपुत्राचा! आज रक्षाबंधनाचा दिवस आहे. हिला तुझ्यासारखा भाऊ भेटला. भाग्यवान आहे माझी लेक. त्या बहिणीनेही भावाला राखी बांधून भावाला उदंड आयुष्य लाभावं अशी प्रार्थना केली.”

पहाटे मायलेकींचा डोळा लागला; पण भल्या पहाटेच तो वीर योध्दा एक पत्र ठेवून निघूनही गेला होता. त्या पत्रात लिहिलं होतं, ‘माझ्या बहिणीच्या लग्नासाठी मी लवकरच पैशांची व्यवस्था करतो. भले मला इंग्रज शिपायांच्या स्वाधीन व्हावं लागलं तरी बेहत्तर!“

पैशांची व्यवस्था करण्यासाठी तो आपल्या क्रांतिकारक मित्राला भेटायला जात असताना कोणीतरी फितुरी केली. अल्फ्रेड पार्कमध्ये इंग्रज शिपायांनी त्याला चारही बाजूंनी घेरलं. गोळीबार सुरु केला. त्याने पाच गोळ्या इंग्रज शिपायांवर झाडल्या. इंग्रजांच्या हाती सापडून अपमानित होण्यापेक्षा आपणच जीवन संपवावं, म्हणून आपल्या पिस्तुलातील सहावी गोळी स्वत:वरच झाडून तो शहीद झाला.

आपल्या मानलेल्या बहिणीसाठी स्वत:च्या जीवाची पर्वा न करणाऱ्या या भारतमातेच्या सुपुत्राचं नाव होतं ‘चंद्रशेखर आझाद!’

चंद्रशेखर यांचं आडनाव तिवारी होतं; पण वयाच्या पंधराव्या वर्षीच ते स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले आणि आपल्या नावापुढे ‘आझाद’ लावू लागले.

- राजेंद्र थोरात





# श्रीरामांची उदात्त विचारसरणी

ही गोष्ट आहे रामायणाच्या काळातली. आज्ञाधारक पुत्रांची आणि बंधुप्रेमाची. म्हणजेच श्रीराम आणि भरत यांची!

श्रीराम वनवासातून परत आल्यानंतर असेच एके दिवशी संध्याकाळी शरयू नदीच्या किनारी भरतासह फेरफटका मारत होते. खूप दिवसापासून भरतच्या मनामध्ये एक प्रश्न निर्माण होत होता. तो त्याने सहज बोलता बोलता श्रीरामांना विचारला, "दादा, राहून राहून एक प्रश्न मनात निर्माण होतोय, की माता कैकयीने मंथरासोबत मिळून तुमच्या विरुध्द जो कट रचला होता, तो अक्षम्य अपराध नव्हता का? त्यांच्या कट-कारस्थानामुळे अयोध्येचे भावी महाराज आणि महाराणी यांना चौदा वर्षे वनवासात जावे लागले, तसेच पिता महाराज दशरथ दु:खी होऊन मरण पावले. अशा अपराधासाठी मातेला खरं तर सुळावर द्यायला हवे होते. मग तुम्ही माता कैकयीला शिक्षा का दिली नाही?"

श्रीरामांनी स्मितहास्य करत उत्तर दिलं, "हे भरत, ज्या मातेनं तुझ्यासारख्या प्रेमळ भावाला जन्म दिला तिला मी दंड कसा देणार?"

या उत्तराने भरताचं समाधान झालं नाही. म्हणून त्याने पुन्हा विचारलं, "समजा, तुम्हाला हा प्रश्न एक लहान बंधू नाही तर अयोध्येचा एक सामान्य

नागरिक म्हणून मी विचारत आहे. त्यावर आपण एका राजाप्रमाणे उत्तर द्यावे, की आपण मातेला शिक्षा का दिली नाही ?"

श्रीराम थोडे गंभीर होत म्हणाले, "हे भरत, माता कैकयीला आपल्या एका चुकीची खूप मोठी शिक्षा भोगावी लागली आहे. वनवासाच्या चौदा वर्षांमध्ये ती प्रत्येक क्षणी एका अपराध्याचं जीवन जगली आहे. आपल्या एका चुकीमुळे तिचा पती मरण पावला आणि दोन पुत्र सोबत असूनही कोणी तिच्याजवळ येईनात. त्यामुळे सर्व सुख असतानाही ती अपराधी भावनेतून कधीच मुक्त झाली नाही. दु:खाचा सल हृदयात घेऊन क्षणाक्षणाला मरणप्राय यातना सहन करत राहिली. वनवास संपल्यानंतरही परिवारातील इतर सदस्य प्रसन्न आणि सुखी झाले; पण ती मात्र कधीच प्रसन्न होऊ शकली नाही. मग मला सांग, कोणता राजा अशा स्त्रीला कठोर दंड देऊ शकेल? आणि शास्त्रात तर असंही म्हटलेलं आहे, की पश्चातापाच्या अश्रूंनी सारे अपराध धुतले जातात. उलट मी नेहमी हा विचार करुन दु:खी होतो; की माझ्यामुळे विनाकारण माझ्या मातेला इतकी कठोर शिक्षा भोगावी लागत आहे."

श्रीराम पुढे म्हणाले, "सारासार विचार केला तर समजेल, की मातेच्या चुकीला अपराध तरी का समजावं ? जर मी वनवासाला गेलो नसतो तर हे जग भरत आणि लक्ष्मण यांसारख्या भावांचं अतूट बंधूप्रेम कसं पाहू शकलं असतं ? मी तर केवळ आपल्या माता-पितांच्या आज्ञेचं पालन केलं होतं; पण तुम्ही दोघांनी तर माझ्या प्रेमाखातर चौदा वर्षे वनवास भोगला आणि समस्त जगापुढे बंधूप्रेमाचं आणि विश्वासपूर्ण संबंधाचं एक उत्तम उदाहरण ठेवलं."

श्रीरामांची ही उदात्त विचारसरणी ऐकून भरताचे डोळे पाणावले. साश्रू नयनांनी त्यानं श्रीरामांना आलिंगन दिलं.

तात्पर्य : कुठल्याही घटना-प्रसंगाचा केवळ एकाच अंगाने विचार करु नये. तर सारासार विवेक बुध्दीने विचार करावा. ❑

## विशेष सूचना

अत्यंत आनंद होत आहे, की सद्गुरुच्या कृपाशीर्वादाने आपल्या सर्वांचे आवडते मासिक हसती दुनिया (मराठी) या मासिकाला जानेवारी २०२४ मध्ये २० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने जानेवारी २०२४ मध्ये प्रकाशित होणारा हसती दुनिया (मराठी) चा अंक विशेषांक या रुपात प्रकाशित करण्यात येणार आहे.

तरी सर्व स्तरातील लेखक आणि वाचक वर्गाकडून कथा, कविता, गीतं, विशेष लेख या बरोबरच हसती दुनिया मासिकाबाबतचे आपले अभिप्राय इ. साहित्य मागवण्यात येत आहे. तसेच शालेय विद्यार्थ्यांकडून आपल्या शैक्षणिक, आध्यात्मिक व चारित्र्यात्मक विकासात हसती दुनियाचे लाभलेले योगदान या विषयीच्या आपल्या भावना, स्वरचित कथा, कविता इ. सुवाच्य अक्षरात लिहून पाठवाव्यात, ही विनंती.

आपले साहित्य दि. २५ ऑक्टोबर २०२३ पर्यंत पोस्टाने किंवा ईमेल आयडी वर पाठवावे.

पत्ता :- संपादक, हसती दुनिया (मराठी)
पत्र-पत्रिका विभाग, संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४
ईमेल आयडी - marathihastiduniya@gmail.com
hduniya.marathi@nirankari.org



# मार्क झुकेरबर्ग

आजच्या युगात संगणक (Computer) हे अत्यावश्यक साधन झालेलं आहे. अशा या संगणक क्षेत्रात अनमोल कामगिरी करणारं एक महान व्यक्तिमत्व आहे; जे फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटचे सहसंस्थापक तसेच अवघ्या बाराव्या वर्षी ज्यांनी आपला मेसेजिंग प्रोग्राम झुकनेट या नावाने तयार केला होता, ते म्हणजे 'मार्क एलियट झुकेरबर्ग' होय. त्यांचा जन्म न्यूयॉर्कमध्ये १४ मे १९८४ मध्ये झाला. बालपणापासूनच त्यांना कॉम्प्युटरचं वेड होतं.

मार्क झुकेरबर्ग एका खासगी कॉम्प्युटर शिक्षकांसह कॉम्प्युटर गेम सुध्दा विकसित करायचे. ते हायस्कूलमध्ये शिकत असताना मायक्रोसॉफ्ट कंपनीने त्यांचे सॉफ्टवेअर विकत घेऊन नोकरी देण्याची इच्छा दर्शवली; पण त्यांनी त्यास नकार दिला. हावर्ड युनिव्हर्सिटीत शिकत असताना ते प्रोग्रॅमर आणि सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणून ओळखले जात. त्यांनी कोर्समॅच, फेसमॅश, हावर्ड कनेक्शन इत्यादी प्रोग्राम तयार केले. मात्र फेसबुकच्या निर्मितीनंतरच ते खरे प्रसिध्द झाले. फेसबुकची सुरुवात त्यांनी आपल्या वर्गमित्रांसोबत ४ फेब्रुवारी २००४ मध्ये वसतीगृहातल्या खोलीतच केली. त्यात त्यांना खूप यश मिळालं. त्याच वर्षी १० लाखाहून अधिक लोक फेसबुकशी जोडले गेले.

फेसबुकविषयी मार्क झुकेरबर्ग म्हणतात, "आम्ही असं काही बनवण्याच्या प्रयत्नात आहोत, की लोक एकमेकांशी जोडले जातील आणि संवादही साधू शकतील."

फेसबुकच्या निर्मितीच्या काळात हावर्डमधून आपल्याला काढून टाकतील अशी त्यांना भीती वाटत होती; परंतु तरीही त्यांनी ती जोखीम पत्करली. जोखीम घेणे आपल्या यशाचे रहस्य आहे असे ते म्हणतात.

ऑगस्ट २०१० मध्ये त्यांना टाईम मॅगझिनने 'पर्सन ऑफ द इयर' या सन्मानाने गौरवले. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी जगातील ४०० श्रीमंत व्यक्तींच्या यादीत ते ३६ व्या स्थानावर होते. लहान वयात त्यांनी जरी यशाचे शिखर गाठले असले तरी सामाजिक बांधिलकी या नात्याने मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी मोठा निधी उभारला आहे. बिल गेट्स, लॉरेन बफेट यांसारख्या दानशूर व्यक्तींशी 'द गिविंग प्लीज' हा करार केला. आपल्या कमाईतील निम्मा हिस्सा ते आयुष्यभर दान करतील अशी व्यवस्था केली.

मित्रांनो, प्रचंड जिद्द, चिकाटी, आशावाद असला, की मग असे झुकेरबर्ग निर्माण होतात. ❑



# हिरोशिमा दिवस

हिरोशिमा हे जपानमधील एक मोठे औद्योगिक शहर आहे. १९४५ मध्ये झालेल्या दुसऱ्या महायुध्दात अमेरिकेने ६ ऑगस्ट रोजी या शहरावर 'लिटलबॉय' या सांकेतिक नावाचा अणुबॉम्ब टाकला. त्यामुळे संपूर्ण शहर उद्ध्वस्त झाले होते. त्यानंतर तीन दिवसांनी म्हणजे ९ ऑगस्टला पुन्हा नागासाकी या शहरावर 'फॅटमॅन' या सांकेतिक नावाच्या अणुबॉम्बने हल्ला करुन पूर्ण शहर बेचिराख केले. आजही अणुबॉम्बच्या किरणोत्सर्गामुळे होणाऱ्या विघातक परिणामाला तेथील नागरिक बळी पडत आहेत. या दोन बॉम्बस्फोटांमुळे झालेल्या मृत्यूंची वास्तविक संख्या जगाला कधीच कळू शकली नाही. हिरोशिमाच्या ३.५ दशलक्ष लोकसंख्येपैकी एक लाख चाळीस हजार लोक एका क्षणात मरण पावले. त्यात काही सैनिक होते तर काही सामान्य नागरिक, लहान मुले, वृध्द व महिला होत्या. नागासाकी या शहरातील हल्ल्यात क्षणार्धात ४० हजार निष्पाप जनता या विध्वंसक अणुबॉम्बचा बळी ठरली होती. स्फोटामुळे शहरातील बहुतांश पायाभूत सुविधा नष्ट झाल्या होत्या.

या दोन बॉम्बहल्ल्यामुळे जपानला १५ ऑगस्ट रोजी दुसऱ्या महायुध्दादरम्यान बिनशर्त आत्मसमर्पण करावे लागले. या हल्ल्यात झालेल्या हानीचा परिणाम म्हणून जपानने कधीही अण्वस्त्रांची निर्मिती न करण्याचे धोरण स्वीकारले आहे. आज कित्येक वर्षे लोटून गेली, पण त्या अणुबॉम्बच्या विध्वंसक परिणामामुळे केवळ नागरिकच नव्हे तर शास्त्रज्ञही चिंताग्रस्त आहेत. या बॉम्बचे जनक डॉ. ओपेनहाइमर यांनी तर पश्चातापामुळे त्याकाळी राजीनामा दिला होता. या दुर्दैवी घटनेला ६ ऑगस्ट रोजी ७८ वर्षे पूर्ण होत आहेत.

अमेरिकेने जपानवर केलेल्या या अणुबॉम्बच्या हल्ल्यात लाखो सैनिक आणि नागरिक मारले गेले होते. त्यामुळे अशी परिस्थिती पुन्हा कधीच कुणावर येऊ नये म्हणून दरवर्षी ६ ऑगस्ट हा दिवस जगामध्ये 'शांतता दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. हा दिवस जपानमधील हिरोशिमा या शहरातील हिरोशिमा शांती स्मारक उद्यान मध्ये दरवर्षी साजरा केला जातो. हा दिवस जपानमध्ये झालेल्या भीषण नरसंहाराची माहिती नवीन पिढीला तसेच अणुयुध्दाची भीषणता साऱ्या जगाला करुन देत आहे. बॉम्बहल्ल्याचा केंद्रबिंदू जिथे होता, तिथली एक घुमट असलेली इमारत अवशेषरुपात आजही त्या घटनेचे स्मारक म्हणून जतन करुन ठेवली आहे. तिला भेट दिल्यानंतरच अणुबॉम्बहल्ल्याची साक्ष मिळते.

वाईटातून चांगले निघते, याचाही प्रत्यय हिरोशिमाने दिलेला आहे. पहिली बाब म्हणजे हिरोशिमा आणि नागासाकीनंतर आजवर अणुबॉम्बचा प्रत्यक्ष वापर कोणीही केलेला नाही. तो केला जाण्याचे बिकट क्षण जगाने काही वेळ निश्चित अनुभवले. अण्वस्त्रयुध्दापायी जग संपूर्ण विनाशाच्या किती जवळ आले आहे हे साऱ्या जगाला समजले असल्याने पुढे संपूर्ण जगात कुठेही आण्विक अस्त्रांचा वापर होणार नाही म्हणून सारे जागतिक नेते व विविध मानवतावादी संघटना जागरुक आहेत. ❐





# मैत्रीचा अंत

एक मगर असते. तिचा पाण्यात सदा दरारा आणि एक वेगळीच दहशत असते. दुसरा असतो अजगर. जमिनीवरचा बलवान, सरपटणारा सम्राट. तो कधीही कुणाचाही घात करतो. या दोघांचं वैशिष्ट्य म्हणजे दोघेही पाण्यात आणि पाण्याबाहेर सुध्दा सहज राहू शकतात. आपले सावज जमिनीवर व पाण्यात सुध्दा सहज गिळून टाकतात. तेही अगदी शिताफीने. एकाची मगरमिठी तर दुसऱ्याचे वेटोळे. त्यातून कुणीही सहजासहजी सुटूच शकत नाही.

जणू एक कबड्डीपटू ज्याची पकड मजबूत. तर दुसरा पैलवान, त्याचीही पकड बलशाली. दोघेही शक्तिमान. तर अशा दोघांची म्हणजेच मगर आणि अजगराची कशी कोण जाणे तेवढीच अतूट-मजबूत अशी मैत्री होती. माझ्या आजीच्या भाषेत सांगायचे झाले तर दृष्ट लागण्यासारखी होती.

बरेच दिवस सरतात. पुस्तकाची पाने पालटावी तशी वेळ निघून जाते. दिव्यातील तेल संपावे तसे दिवसामागून दिवस आणि रात्रीपासून रात्र संपून

उर्वरित पान क्र. ११ वर



विचारपुष्प

# प्राथमिकता प्रभूला

समजा, आपण एखाद्या काचेच्या डबीमध्ये हिरा ठेवला आणि ती डबी जरी खाली पडून फुटली, तरी हिऱ्याचं मात्र काही नुकसान होत नाही. याप्रमाणेच हा देह देखील काचेच्या डबी सारखाच आहे. या देहाच्यामध्ये जो आत्मा आहे, तो मात्र अविनाशी परमात्म्याचा अंश आहे. हिऱ्यासारखा अनमोल आहे. अशा या अविनाशी आत्मस्वरुपाची ओळख झाल्यावर आपण भयमुक्त होतो.

कधी-कधी आपलं मन उदास होत असतं. कारण आपल्या आजूबाजूचं वातावरण चांगलं नसतं; परंतु कधी कधी तर आपण आपल्या स्वत:च्या घरात असूनही आपल्याला उदासवाणं वाटत राहतं. याचा अर्थ सुख किंवा दु:ख हे

बाहेरील गोष्टींवर अवलंबून नसून आंतरिक अवस्थेवर अवलंबून आहेत. आपण जर आपलं मन नेहमी या निरंकाराशी जोडून ठेवलं, तर ते नेहमी आनंदीत राहील. कारण निरंकार परमात्मा हा स्वत: आनंदाचा स्त्रोत आहे.

एखाद्या तलावाला आपण तलाव तेव्हाच म्हणू शकतो जेव्हा त्याच्यामध्ये पाणी असतं. एखादं फूल जर सुकलेलं असेल, त्याच्यात सुगंधही नसेल तर त्याला फूल म्हणता येणार नाही किंवा एखाद्या इमारतीमध्ये विद्यार्थीही नसतील आणि शिक्षकही नसतील तर त्या जागेला आपण शाळा म्हणत नाही. याचाच अर्थ असा, की कुठलीही वस्तू, व्यक्ती किंवा स्थान याची किंमत तेव्हाच असते जेव्हा त्याच्यामध्ये ते गुण उपस्थित असतात. म्हणून मनुष्य म्हणवण्यासाठी देखील मानवी गुण आपल्यामध्ये असणे गरजेचे आहे. म्हणूनच संतांनी संतमत धारण करण्याची आणि भक्ती करत नि:स्वार्थपणे इतरांसाठी जीवन जगण्याची प्रेरणा दिली. कारण भक्त हा कधीही तक्रार करत नाही. तो प्रभू परमात्म्याला समर्पित झालेला असतो आणि नेहमी कृतज्ञता व्यक्त करतो. परमात्मा सर्वत्र आहे. सारं काही जाणणारा आहे. म्हणून भक्त प्रत्येक कर्म परमात्म्याला समर्पित करतात. आपण आपल्या इच्छेला जर प्राथमिकता दिली आणि अटी घालून भक्ती केली तर नुकसान आपलंच होणार.

परमात्मा जे काही करतो ते आपल्या भल्यासाठीच करतो. एकदा समुद्रात तुफान आलं, नाव डगमगू लागली. नावेतले सगळे प्रवासी घाबरुन गेले; परंतु थोड्या वेळानंतर त्यांच्या लक्षात आलं, की जर तुफान आलं नसतं तर आपली नाव किनाऱ्याला लागली नसती. अनेकदा आपल्याला असं वाटतं, की आपल्या बाबतीत जे झालं ते ठीक झालं नाही; परंतु ब्रह्मज्ञानी मात्र परमात्म्याच्या इच्छेत जगत असतात. परमात्म्यालाच प्राथमिकता देत असतात. ❐

## मैत्रीचा अंत

(पान ०९ वरुन)

जाते. पाण्यात मगर आणि जमिनीवर अजगर दोघेही उपाशीच असतात. अगदी ढिम्म. शिकारीची वाट पाहत. एखाद्या खडकासारखे तटस्थ. वाट पाहण्यात दोघांचीही वाट लागण्याची वेळ येते.

बरं का मित्रांनो, या दोघांपेक्षा वेळच मोठी बलवान ठरते. कशी ते सांगतो.

मगर शिकारीच्या शोधार्थ पाण्यात आणि पाण्याबाहेर धडपड करुन थकून जाते. तीच अवस्था अजगराची. दोघेही भुकेने कासावीस होतात.

पुढे ऐका, अजगराला सुस्त पडलेले पाहून मगरीच्या मनात विचार येतो, की आपण यालाच खाऊ या आणि मगर विचारप्रमाणे कृती करते. अजगराला शेपटीकडून खायला सुरुवात करते. मगरीचा कावा अजगराच्या लक्षात येतो आणि या दगाबाज मगरीला धडा शिकवण्याची मनी खूणगाठ बांधत अजगर सुध्दा वळसा घेऊन मगरीला गिळण्यास सुरुवात करतो.

मगर आणि अजगर एकमेकांना गिळू पाहतं, पण खरं सांगायचं तर काळच त्यांना गिळू पाहत असतो आणि होतेही तसंच. एकमेकांना अर्धेअधिक गिळून टाकल्यामुळे दोघेही संपतात आणि दोघांमधील मैत्रीही संपते. असा होतो पृथ्वीवरील दोन जीवांच्या मैत्रीचा अंत.

तात्पर्य : विश्वासघात करणाऱ्यांचा सुध्दा विश्वासघात होतोच. ❐

❖ संकलन - परिमल ठाकूर (उरण)

# गौरव देशाचा वाढत जावो

गौरव देशाचा वाढत जावो, उंच तिरंगा फडकत राहो।
रक्त सांडले ज्यांनी भूवर, स्मरण त्यांचे सदैव राहो ।।१।।

डोंगर, पर्वत शिखरांनी, नटलेला हा भारत देश।
रक्षण करण्या उभा ठाकला, हिमालयाचा उंच प्रदेश ।।२।।

सैनिक देती सदैव पहारा, तळहातावर घेऊन प्राण।
शूरवीर या जवानांचा, हृदयी जपा सार्थ अभिमान ।।३।।

विविध प्रांत, विविध देश, विविध बोलीभाषांचा।
प्रिय आमचा भारत देश, कणखर दगडा मातीचा ।।४।।

जपू या संस्कृती भारताची, जगात तिजला आहे मान।
आजही आहे देशात आमच्या, दर्जा स्त्रीला मातेसमान ।।५।।

देशवासी बांधवानो, बाळगा मनी देशाभिमान।
शत्रूपुढे कधीही कोणी, झुकवू नका आपली मान ।।६।।

पाऊणशे वर्षे लोटली आता, भारतमातेच्या स्वातंत्र्याला।
विसरा सारे भेदभाव, परि विसरु नका या भूमातेला ।।७।।

कवयित्री : सौ. वासंती भोसले
(सांगली)



# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्गुरु बाबाजींचे

प्रश्न : माया म्हणजे काय ? मायेची रचना कशाप्रकारची असते ?

उत्तर : माया या शब्दाचा अर्थ प्रेम किंवा पैसा. परंतु अध्यात्म्यात ईश्वरनिर्मित दृश्य-अदृश्य सृष्टीला माया असे म्हणतात. यामध्ये पंचमहाभूते आणि दृश्य व अदृश्य जग येतात. साधारणतः दृश्य जगात सूर्य, चंद्र, तारे, स्थूल जगात धरती, अग्नि, पाणी आणि अदृश्य(सूक्ष्म) जगात जीव, वायू, आकाश या गोष्टी येतात. त्यांना प्रकृती असे म्हटले जाते. या नऊ प्रकृतींपासून साऱ्या सृष्टीची रचना झालेली आहे. या नऊ प्रकृतीत सतत घडामोडी होत असतात. म्हणून प्रकृतीला नाशिवंत म्हटले आहे. प्रकृती नाशिवंत जरी असली तरी ती पुन्हा निराकारातच विलीन होते.

ब्रह्माच्या ठिकाणी स्फुरण घेऊन (एको हं बहुस्याम) मूळमायेची निर्मिती होते. मूळमाया ही परमात्म्याचीच शक्ती आहे. तिच्यापासून त्रिगुणात्मक माया तयार होते. ते तीन गुण म्हणजे सत्व, रज व तम. त्रिगुणाचा व पंचमहाभूतांचा पसारा म्हणजेच ही सारी विश्वाची रचना.

प्रत्येक प्राणीमात्राची रचना पंचमहाभूते (पृथ्वी, जल, वायू, अग्नि व आकाश) व त्रिगुणात्मक गुणमाया यांनी बनलेली असल्यामुळे सृष्टीत विविधता दिसून येते.

मायेमध्ये भौतिक वस्तू आणि मानवी भाव-भावना, इच्छा-आकांक्षा यांचाही समावेश आहे. याबाबत अवतारवाणी पद क्र.१० मध्ये सविस्तर वर्णन आले आहे.

❍❍❍❍

प्रश्न : मुक्ती म्हणजे काय ? त्यासाठी काय आवश्यक आहे ?

उत्तर : मुक्ती म्हणजे अवस्थेत झालेला बदल. जडजीवाचं अज्ञान नष्ट होऊन अहंब्रह्मास्मिचं स्फुरण होणं, जीव अवस्था संपून जाणं तिथं काहीच न उरणे म्हणजे मुक्ती.

स्वप्नातील गोष्टी जागेपणी प्रत्यक्षात नसतात, भर दुपारी तप्त वाळवंटात पाणी नसून तो पाण्याचा भास आहे हे समजणे म्हणजे भ्रम दूर होणे. तसे मी शरीर नसून अविनाशी आत्मा आहे याची जाण येणे म्हणजे ब्रह्मज्ञान! ब्रह्मज्ञानामुळेच मुक्ती संभव आहे आणि हे सद्गुरुच्या कृपेने शक्य होते.

❍❍❍❍

# शब्दकोडे

# २२१

❍ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ■ | २ | ■ | ३ | | ४ |
| | ■ | ५ | | | ■ | |
| ६ | | | ■ | ७ | | |
| | ■ | | ■ | | ■ | |
| ८ | | | ■ | ■ | ९ | ■ |
| | ■ | ■ | १० | | | |
| ■ | ११ | | | ■ | | ■ |
| १२ | | ■ | १३ | | | |

## आडवे शब्द

३. कापूस आणि बाजरी यातील नगदी पीक ?
५. कोकम सरबत...... पासून बनते.
६. मृग, काळवीट
७. मिर्झा ........ हे प्रसिध्द शायर होते
८. आफ्रिका खंडातील नायजेरिया देशाची राजधानी (कोलंबो / लागोस)
१०. हिराकूड धरण कोणत्या नदीवर आहे ?
११. आईची बहीण
१२. या नदीकाठी पंढरपूर शहर वसलेले आहे
१३. भरत आणि शत्रुघ्नचे वडील

## उभे शब्द

१. भारताचे पहिले पंतप्रधान (नाव)
२. राष्ट्रीय क्रीडा दिन ..... ऑगस्टला साजरा करतात
३. गटात न बसणारा शब्द : गोदावरी, महानदी, कामगार, ब्रह्मपुत्र
४. महिन्यांची उलट मोजणी करताना येणारा इंग्रजी चौथा महिना
९. जम्मू काश्मीर राज्याची राजधानी
१०. मुसलमान बांधवांचे प्रार्थना स्थळ
११. आईचा भाऊ

उत्तरे इतरत्र

# भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या रंजक गोष्टी

❐ अशोकचक्रासह २४ आरे असलेला भगवा, पांढरा आणि हिरवा पट्टा असलेला तिरंगा ध्वज अधिकृतपणे २२ जुलै, १९४७ रोजी स्वीकारण्यात आला आणि १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी फडकवण्यात आला.

❐ स्वातंत्र्याच्या वेळी भारताचे अधिकृत राष्ट्रगीत नव्हते. रवींद्रनाथ टागोर यांनी १९११ मध्ये रचलेल्या 'भारत भाग्यो विधाता' या गीताचे नाव बदलून 'जन गण मन' असे ठेवण्यात आले. २४ जानेवारी १९५० रोजी भारताच्या संविधान सभेने हे 'राष्ट्रगीत' म्हणून स्वीकारले.

❐ राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' हे बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी १८८० च्या दशकात लिहिलेल्या 'आनंदमठ' या कादंबरीचा भाग होते. २४ जानेवारी १९५० रोजी 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारण्यात आले.

❐ प्रत्येक स्वातंत्र्यदिनी भारताचे पंतप्रधान लाल किल्ल्यावर ध्वज फडकवतात. पण १५ ऑगस्ट १९४७ रोजी असे घडले नाही. लोकसभा सचिवालयातील एका शोध निबंधानुसार, जवाहरलाल नेहरुंनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी लाल किल्ल्यावरुन ध्वज फडकवला.

❐ १५ ऑगस्ट रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्या सीमारेषा नव्हती, ब्रिटिश बॅरिस्टर सर सिरिल रॅडक्लिफ यांनी ३ ऑगस्ट १९४७ रोजी सीमांकन केले. १७ ऑगस्ट रोजी रॅडक्लिफ लाईनच्या घोषणेद्वारे भारत आणि पाकिस्तानच्या सीमा निश्चित केल्या.

❐ पहिल्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यास महात्मा गांधीजी हजर नव्हते. त्या दिवशी ते दिल्लीपासून हजारो किलोमीटर दूर बंगालच्या नौखाली येथे होते. हिंदू आणि मुस्लीमांमधील जातीय हिंसा थांबवण्यासाठी उपोषण करत होते.

❐ १५ ऑगस्ट ही तारीख लॉर्ड माऊंटबॅटन यांनी स्वत: आपल्या अधिकारक्षेत्रात निश्चित केली होती. दुसऱ्या महायुध्दात मित्र राष्ट्रांच्या सैन्यासमोर जपानने शरणागती पत्करली. त्या वेळी लॉर्ड माऊंटबेटन मित्रराष्ट्र सैन्याचे कमांडर होते. त्यांचा दुसरा वर्धापन दिवस १५ ऑगस्ट रोजी होता. तोच दिवस भारताचा 'स्वातंत्र्य दिन' म्हणून निवडला होता.

❐ भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचा स्वातंत्र्य दिवस ब्रिटीश कायद्यानुसार १५ ऑगस्टच नमूद करण्यात आला आहे. मात्र पाकिस्तानचा स्वातंत्र्य दिन १४ ऑगस्ट १९४७ रोजी साजरा करण्यात आला. कारण लॉर्ड माऊंटबॅटन यांना भारत आणि पाकिस्तानच्या दोन्ही देशांच्या स्वातंत्र्यदिनाला उपस्थित राहण्यास भाग पाडले गेले. परंतु बऱ्याच अधिकृत कागदपत्रात पाकिस्तानचा स्वातंत्र्य दिवस १५ ऑगस्टच होता. पाकिस्तानचा स्वातंत्र्य दिन १४ ऑगस्टला साजरा करायचा असा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत कोणी ठेवला याविषयी मात्र कोणतीही नोंद नाही. ❐

# चित्रकथा

चित्रांकन व लेखन : अजय कालरा







शेठजी! मला माझा पगार द्या. मला घरात रेशन आणायचं आहे.
कुठला पगार? तुम्ही इथे जे खाता-पिता; त्याचे कधी मी पैसे मागितले? पगार वगैरे काही मिळणार नाही.
जर सगळेच जणं आपला पगार मागायला लागले तर माझं फार नुकसान होईल.
सावकाराने गावात दवंडी दिली, की जो कोणी माझ्या एका प्रश्नाचं अचूक उत्तर देईल त्याला वर्षभराचं रेशन मोफत देण्यात येईल. आणि जर उत्तर चुकीचं दिलं तर त्याला वर्षभर माझ्या शेतात बिना पगारी काम करावं लागेल.


दुसऱ्या दिवशी सावकाराच्या घराबाहेर बरेच स्पर्धक जमा झाले. सावकाराने त्यांना पुन्हा सांगितलं, की जर उत्तर चुकीचं दिलं तर वर्षभर तुम्ही माझे नोकर बनून राहाल.
ह्या दोघांमधील कोणतं फूल खरं आहे ?
उजव्या हातातलं फूल खरं आहे.
उत्तर चुकलय
एकेक करत गावातील लोक सावकाराचे नोकर बनत चालले होते.
एके दिवशी पंधरा वर्षाचा भरत सावकाराच्या घरी स्पर्धेसाठी आला.
शेठजी मी जर स्पर्धा हारलो तर मी तुमचा नोकर बनून राहिल पण जर मी जिंकलो तर तुम्हाला या सर्व नोकरांना मुक्त करावे लागेल.
मला मान्य आहे.


सांग, यातील खरं फूल कोणतं आहे ?
मी माझं उत्तर पाच तासानंतर देईन.
पाच तासानंतर
डाव्या हातातील फूल खरं आहे. कारण ते कोमजलं आहे.
मी माझी हार स्वीकार करतो आणि सर्व नोकरांना मुक्त करतो.
सर्व नोकर भरतचे आभार मानतात. भरतचे वडील त्याच्या चातुर्यावर फार खुश होतात.
तात्पर्य : बुध्दी ही वयापेक्षा मोठी असते.

# वाढदिवसाच्या लक्षावधी शुभेच्छा



सान्वी म्हात्रे



सावी पाटील



हर्षिता निकम



प्रेरणा शिंदे



विहा बागडे




श्रिया पवार



शिवबा शिर्के



प्रियल सुपूगडे



समृध्दी कदम



ओवी वाघमारे



जिजा कावणकर




सक्षम घाडी




ईश्वरी राऊत



श्रेया पाटील




ईश्वरी म्हात्रे



आशिष कुंभार



सौंदर्या पाटील



मनवा वडियार



सुनिष्ठा कदम



स्वराज रोडगे

# शांतिब्रह्म : संत एकनाथ

संत एकनाथांची लोकप्रियता जसजशी वाढत होती. तस-तशी त्यांची विरोधक मंडळी, कुटाळक्या करणारे त्यांचा छळवाद करुन त्यांची शांती भंग करण्याचा प्रयत्न करत होती.

नित्यनेमाने नाथ गोदामाईत स्नानाला जात. स्नान करुन ओलेत्यानंच ते परतत. अनेक दिवसांपासूनचा त्यांचा हा नियम होता. एकदा ते असेच स्नान करुन परतत असताना कोणीतरी माडीवरुन पान खाऊन त्यांच्या अंगावर पिंक टाकली. नाथांनी वर न पाहता पुन्हा जाऊन स्नान केले. असे एक-दोनदा नाही तर अनेक वेळा झाले. नाथांचं पुन:पुन्हा स्नान करणंही चालू होतं. शेवटी त्या पिंक टाकणाऱ्या महाभागाला स्वत:ची लाज वाटली आणि तो माडीवरुन धावतच खाली आला.

"माफ करो महाराज, मै गुनाहगार हूँ।" असे म्हणत त्याने नाथांच्या चरणी लोळण घेतली. रडत रडत तो पुन:पुन्हा क्षमा मागत होता.

त्याला प्रेमाने उठवत नाथ म्हणाले, "अरे बाबा, का उगाच रडून शिणवतोस स्वत:ला ? उलट मीच तुझे आभार मानायला हवेत. तुझ्यामुळे मला आज असंख्य वेळा गोदामाईचं स्नान घडलं."

नाथांना राग यावा, त्यांचं कोणाशी तरी भांडण व्हावं असं विरोधकांना वाटे; पण बरेच प्रयत्न फोल ठरले. एकदा एक गरजू गृहस्थ त्यांना भेटला. त्याच्या मुलीचं लग्न जवळ आलं होतं, त्याला दोनशे रुपयांची गरज होती. त्याने अनेक जणांचे उंबरठे झिजवले; पण त्याला पैसे कोणी देईना. कुटाळखोरांनी त्याला सांगितले, "तुला आम्ही



दोनशे रुपये देऊ पण एका अटीवर... तू त्या एकनाथांच्या घरी जाऊन त्यांना राग येईल असे काहीतरी करुन दाखव." तो तयार झाला. गरजवंताला अक्कल नसते म्हणतात तसे!

नाथांच्या वाड्यात शिरताच तो पायात चपला घालूनच थेट देवघरात गेला. नाथ ग्रंथ-पठन करत होते. हा तसाच जाऊन त्यांच्या मांडीवर बसला. ते पाहून नाथ गिरिजाबाईंना हाक मारत म्हणाले, "अहो, इकडे या पाहू अतिथी आलेत, ते मला भेटायला किती आतुर झाले आहेत बघा, जरा त्यांचे जोडे बाहेर ठेवून या." गिरिजाबाई हसतमुखाने आल्या. त्या आगंतुकाला नमस्कार केला. त्याच्या पायातल्या चपला स्वत:च्या हाताने काढून बाहेर ठेवल्या. त्या गृहस्थाने पाहिले, की ही मात्रा काही लागू पडली नाही.

उर्वरित पान क्र. २३ वर



# वस्तूचे मोल

एका नगरीमध्ये एक श्रीमंत गृहस्थ राहत होता. त्याच्या घरात चांदीची पुष्कळ भांडी होती; ती भांडी त्याने कधीच वापरायला काढली नाही. ती भांडी तो खूप जपून ठेवत असे, कारण त्याला असं वाटायचं, की जेव्हा एखादी विशेष व्यक्ती घरी येईल, तेव्हा आपण ती काढू या.

अनेकदा घरी एखादा सण किंवा उत्सव असे. तेव्हा विशेष पाहुणेही घरी येत; पण ऐनवेळी त्याचा विचार बदलायचा आणि तो त्या भांड्यांचा वापर करणे टाळायचा.

एक दिवशी एक संत-महात्मा त्याच्या घरी आले. त्याने विचार केला, की आज आपण या महात्म्यांना चांदीच्या ताटामध्ये भोजन वाढायचं; परंतु संत महात्म्यांची साधी राहणी पाहून त्याचा विचार बदलला. त्याने विचार केला, की चांदीची भांडी खूप किंमती आहेत. गावोगावी भटकणाऱ्या या महात्म्यासाठी ती कशाला काढायची? नाहीतरी त्यांना त्याचे मोल काय कळणार? एखादी श्रीमंत असामी आली तर त्यांच्यासाठी ही भांडी काढू.

काही दिवसांनी एक धनाढ्य व्यापारी त्याच्या घरी काही कामासाठी आला. त्या व्यापाऱ्याला भोजन वाढण्यासाठी त्या व्यक्तीने चांदीची भांडी बाहेर काढण्याचा विचार केला; पण जेव्हा गप्पांच्या ओघात त्याला कळलं, की या व्यापाऱ्याला व्यापारात खूप नुकसान झालं असून तो कर्जबाजारी देखील झालेला आहे. तेव्हा लगेच

त्याचा विचार बदलला. अरे! हा तर आपल्या तोलामोलाचाही नाही, मग कशाला याच्यासाठी चांदीची भांडी काढायची? त्या कंजूष व्यक्तीने ती भांडी पुन्हा कपाटात ठेवून दिली.

अशा रीतीने अनेक वर्षे निघून गेली; पण ती चांदीची भांडी काही त्याने वापरायला काढली नाहीत. शेवटी वर्षानुवर्षे कपाटात राहिल्यामुळे ती भांडी काळी पडली.

एके दिवशी अचानक त्याचा मृत्यू झाला. पुढे त्याच्या तरुण मुलाने विवाह केला. त्याची पत्नी जेव्हा घरात आली तेव्हा तिने सर्व सामान व्यवस्थित लावायला घेतलं. त्यावेळी तिला कपाटात काळी ठिक्कर पडलेली भांडी दिसली. ती भांडी चांदीची आहेत हे न समजल्यामुळे तिने सगळी भांडी काढून बोहारणीला देऊन टाकली.

तात्पर्य; वस्तू कितीही मौल्यवान असली तरी ती जर वापरात नसेल, तर तिचे काहीच मोल राहत नाही. म्हणून वस्तूंचा योग्य तो वापर करणे आवश्यक आहे. वस्तू वापरात असेल तरच तिची किंमत आहे.

सद्‌गुरु बाबाजी म्हणतात, वस्तू माणसांसाठी असतात. माणसं वस्तूंसाठी नसतात; परंतु आज माणूस त्याच वस्तूंसाठी माणसांचा वापर करतोय, हेच खरं दुर्दैव आहे. ❒ संकलन : मनीषा साळुंखे (मीरा रोड)

## शांतिब्रह्म : संत एकनाथ (पान २१ वरुन)

गिरीजाबाईंनी त्याला हात-पाय धुवायला पाणी दिले. नाथांनी गिरिजाबाईंना जेवण वाढावयास सांगितले. तो नाथांच्या शेजारी जेवायला बसला. गिरिजाबाई खाली वाकून वरण-भातावर तूप वाढत असताना तो उठला आणि त्यांच्या पाठीवर जाऊन बसला. ते पाहून नाथ पत्नीला म्हणाले, "सांभाळा बरं, नाहीतर पडतील बिचारे" त्यावर गिरिजाबाईंनी हसत-हसत उत्तर दिलं, "अजिबात पडू देणार नाही मी त्यांना, माझ्या हरीला पाठीवर घेऊन कामं करण्याची सवय आहे मला." एकनाथ शांतिब्रह्म तर गिरिजाबाई शांतिसरिता! तेव्हा त्यांना राग आणावयाचा कसा? बिचारा गृहस्थ गिरिजाबाईंच्या चरणांवर डोकं ठेवून ढसाढसा रडू लागला. "माऊली मला क्षमा करा. नाथबाबा, मी चुकलो." असे म्हणून स्वतःच्या थोबाडीत मारुन घेऊ लागला. नाथांनी त्याला शांत करत त्याची विचारपूस केली. त्याने सारी हकिकत त्यांना सांगितली. त्यावर ते म्हणाले, "अहो, एवढंच ना, मग हे आधी नाही का सांगायचं? उगीच शिणलात आपण."

नाथांनी त्या गृहस्थाला जेवू घातलं आणि दोनशे रुपये देऊन त्याची गरज भागवली. कुटाळखोरांची पुन्हा एकदा घोर निराशा झाली. ❒

## अनमोल वचन

हे ब्रह्मांड आपल्या विचारानुसार नाही तर निराकाराच्या विधी-विधानानुसार चालते. प्रभूच्या या विधानास आपण जेवढ्या लवकर समर्पित होऊ तेवढी लवकर आपल्याला मानसिक शांतता लाभेल. बऱ्याचदा त्याने केलेल्या गोष्टींवर किंतु परंतु करुन आपण आपलेच नुकसान करुन घेतो.

मनाविरुध्द घडणाऱ्या गोष्टींचा आणि मनाविरुध्द वागणाऱ्या व्यक्तींचा सतत विचार केल्याने फक्त आपलाच वेळ वाया जातो. त्या गोष्टीला आणि त्या व्यक्तीला मात्र काडीमात्र फरक पडत नाही.

## आपल्याला गोष्टी ऐकायला का आवडतात?

गोष्टीचं बाह्यरुप काहीही असलं तरी मुलभूत तत्त्व केवळ तीनच रुपांचं असतं. असं वैज्ञानिकांचं म्हणणं आहे. प्रेम, सत्तासंघर्ष आणि सामाजिक परिस्थिती या तीन मूलभूत मुद्यांभोवती गोष्टी विणलेल्या असतात. यातच, गोष्टी ऐकण्यात आपल्याला मजा का वाटते याचं रहस्य दडलेलं आहे असं मानसशास्त्रज्ञ आणि मज्जा शास्त्रज्ञ यांचंही म्हणणं आहे. एक तर गोष्ट ऐकण्यात आनंद वाटणं ही भावना आपल्या मज्जातंतूंच्या जाळ्यात विणलेली असते. त्यामुळे गोष्ट ऐकताच ते जाळं उद्दीपित होऊन आनंदाची भावना जागृत करणारे स्त्राव शरीरात पाझरु लागतात आणि शरीर उल्हासित होऊन जातं.

गोष्ट ऐकण्यात मजा वाटण्याचं आणखी एक कारण म्हणजे जिज्ञासावृत्ती. आपण समूहात राहणारे प्राणी आहोत. समाजजीवनाला मनुष्य प्राण्याच्या भावविश्वात फार मोठं स्थान आहे. या समाजात नेमकं कसं वागावं, याची शिकवणच आज या गोष्टींमधून मिळणाऱ्या वेगवेगळ्या सामाजिक परिस्थितीच्या, त्यात वावरणाऱ्या वेगवेगळ्या व्यक्तींच्या वागण्यातील चढ-उताराच्या ओळखीतून मिळत जाते. त्या भावनांशी तादात्म्य पावण्याची क्षमता मुळातच असल्यामुळे मग त्या गोष्टींमधील पात्रांच्या वागणुकीतून समाजात वावरताना पाळायच्या नियमांची, कायद्याची ओळख पटत जाते आणि ती शिकवण अंगवळणी पडायला मदत होते. त्यामुळे मनोरंजनाबरोबरच हसत खेळत अवघड शिक्षण देण्याची ती एक प्रणाली आहे. ❐

## पक्ष्यांचा थवा बाणाच्या टोकाच्या आकारात का उडतो?

तिन्हीसांजा झाल्यावर आपापल्या घरट्याकडे परतणाऱ्या बगळ्यांची तसेच इतर पक्ष्यांचीही आकाशातली माळ बाणाच्या टोकासारखी किंवा इंग्रजीतल्या 'व्ही 'सारखी रचना करुन उडताना दिसते. साहजिकच तो पक्ष्यांचा थवा असं का करतो, हा प्रश्न त्या बाणासारखाच टोचत राहतो. त्याची दोन कारणं आहेत. पहिलं म्हणजे, तसं केल्याने त्यांना ऊर्जेची बचत करता येते. हवेतून उडताना त्यांना हवेच्या किंवा खरंतर वाऱ्याच्या विरोधाला तोंड द्यावं लागतं. त्याच्यावर मात करण्यासाठी त्यांना काही ऊर्जा खर्च करावी लागते. एकापाठोपाठ सरळ रेषेत जर हे पक्षी उडत राहिले तर पुढच्याच्या उडण्यापायी हवेत उठलेल्या आवर्तनांचाही सामना त्यांना करावा लागतो. तो टाळण्यासाठी हे पक्षी पुढच्या पक्ष्यांच्या जरासं वर आणि बाजूला असे उडत राहतात. त्यामुळे त्यांना ऊर्जेची बचत करता येते. तसेच आपल्या जागा बदलत, जरा थकलेल्या व पुढच्यात राहून मार्गदर्शन करणाऱ्या पक्ष्यांना विश्रांतीही देता येते.

दुसरं कारणही तितकंच महत्त्वाचं आहे. कारण अशा बाणाच्या टोकासारख्या रचनेत थव्यातल्या प्रत्येक पक्षाकडे लक्ष ठेवणं सोपं जातं. त्यामुळे कोणीही वाट चुकून भरकटणार नाही, याची खात्री करुन घेता येते. तसेच अधेमधे मुक्काम करायचा असल्यास किंवा जर कोणाला काही कारणाने मदत लागलीच तर इतरांना सावध करुन सर्वच थवा एका ठिकाणी उतरु शकतो.

या कारणांमुळेच असावं, पण लढाऊ विमानांचा काफिला जेव्हा एकमेकांच्या साथीने उडत असतो तेव्हा तोही याच प्रकारच्या रचनाबंधाचा अवलंब करतो. ❐

❖ संकलन - रुपाली शिंदे (अंबरनाथ)



# ज्ञानानुसार कर्म असावं


ज्याप्रमाणे फुलाची ओळख त्याच्या सुगंधावरुन होत असते, तशी ब्रह्मज्ञानीयांची ओळख ही त्यांच्या कर्मावरुन होत असते. कोणी कितीही विद्वान असला, वेदशास्त्रांचा जाणकार असला, तरी ज्याचं कर्म ज्ञानानुसार नाही किंवा ज्याच्या मनात अहंकार-अभिमान आला त्याचं ज्ञान व्यर्थ ठरतं.

रामायणात देखील आपण एक कथा वाचतो, की रावण खूप मोठा भक्त होता. वेदशास्त्रांचा ज्ञाता होता. सर्वशक्तिमान देखील होता; परंतु जेव्हा रावणाच्या मनात माता सीतेचं अपहरण करण्याची दुर्भावना जागृत झाली तेव्हा त्याला साधू वैराग्याचा वेश धारण करावा लागला होता. जेव्हा तो त्या अवस्थेत जाण्यासाठी निघाला, तेव्हा रावणाच्या पत्नीने त्याला विचारलं, "कुठे निघालात? काय विचार आहे तुमच्या मनात?" रावण म्हणाला, "मी सीतेचं अपहरण करायला चाललोय." रावणाच्या त्या अवताराकडे पाहत त्याची पत्नी म्हणाली, "सीतेचं अपहरण करण्याचा फक्त विचारच तुम्ही केला आहे तर तुमची ही दशा आहे. कुठे गेला तुमचा तो शिरावरचा ऐटदार मुकुट? कुठं गेली ती आलिशान राजवस्त्र? सीताहरणाचा विचार आल्यावर तुमची दशा तर एखाद्या भिकाऱ्यासारखी झाली आहे. पण जेव्हा तुम्ही प्रत्यक्ष हे कर्म कराल तेव्हा तुमची काय अवस्था होईळ? या विचारानेच माझं मन चिंतीत झालं आहे. ज्याची बुध्दी मलीन झाली आहे, ज्याने ज्ञानानुसार कर्म केले नाही तर त्याचा नाश होतो."

रावणाचा केवढा मोठा परिवार होता. सोन्याची लंका होती; परंतु त्या रावणाविषयी म्हटले आहे -

एक लख नाती, सवालख पूत
तीस रावण के घर दिया न बाती

रावणाचा संपूर्ण परिवार नष्ट झाला. आजही त्याचा पुतळा जाळला जातो. भले तो किती विद्वान आणि शक्तिशाली होता; परंतु ज्ञानानुसार कर्म नव्हतं. ❐



कथा

# बोलण्याची पध्दत

असे म्हटले जाते, की मनुष्याला बोलण्यासाठी बालपणी दोन अडीच वर्षे लागतात; परंतु काय बोलावे आणि काय बोलू नये हे शिकण्यासाठी मात्र संपूर्ण आयुष्य देखील कमी पडतं. म्हणून केवळ बोलता येणं महत्त्वाचं नाही, तर कसं बोलावं हे महत्त्वाचं आहे. अशाच आशयाची ही एक कथा आहे.

एका राजाला आपले भविष्य जाणून घेण्याची खूप जिज्ञासा होती. एके दिवशी एका प्रख्यात ज्योतिषाला आपला हात दाखवत तो म्हणाला, ज्योतिषीबुवा! आमच्या नशिबात पुढे काय लिहून ठेवलंय ते जरा सांगा. ज्योतिषाने राजाचा हात पाहिला आणि तो म्हणाला, महाराज! तुम्हाला तुमच्या डोळ्यादेखत सर्व नातेवाईकांचा मृत्यू पाहावा लागणार आहे. हे शब्द ऐकताच राजाला क्रोध आला आणि त्याने ताबडतोब प्रधानाला हुकूम दिला, "अशुभ बोलणाऱ्या ज्योतिषाला ताबडतोब तुरुंगात टाका."

काही दिवसानंतर राजदरबारामध्ये दुसऱ्या राज्यातला एक विद्वान ज्योतिषी आला, राजाने त्यालाही आपला हात दाखवत म्हटले, "ज्योतिषीबुवा! आमच्या नशिबात काय लिहून

ठेवलंय जरा सांगाल का ?" ज्योतिषाने राजाचा हात पाहत म्हटले, "वा ! महाराज तुमच्या हातात तर फार उत्तम योग दिसतात. भगवंताच्या कृपेने तुम्हाला भरपूर आयुष्य लाभणार आहे. तुम्ही दीर्घायुषी व्हाल." हे ऐकताच राजा अतिशय खुश झाला. त्याने ज्योतिषाला आपल्या गळ्यातील रत्नहार काढून दिला. हे पाहून प्रधानजी विचार करु लागले, की ज्या ज्योतिषाला राजाने तुरुंगात टाकले त्यानेही हेच भविष्य राजाला सांगितलं. पण मग एकाला शिक्षा आणि दुसऱ्याला बक्षीस का ? तेव्हा त्यांच्या लक्षात आलं, की इथे पहिल्या ज्योतिषाला कसे बोलावे याचे भान नव्हते.

प्रधानजींनी ही गोष्ट राजाच्या लक्षात आणून देत म्हटले, "महाराज ! ज्या ज्योतिषाला तुम्ही तुरुंगात टाकले त्यांनी देखील हेच भविष्य कथन केलं होतं. तुम्हाला दीर्घायुष्य मिळणार याचा अर्थ तुमचे नातेवाईक तुमच्यासमोर मृत्यू पावणार तेव्हा तुम्ही जिवंत असणार हाच त्याचा अर्थ नाही का ?" राजाला आपली चूक लक्षात आली. त्याने ज्योतिषाला मुक्त केले.

सत्यकथन करताना देखील योग्य शब्दांचा वापर केला तर असे प्रसंग टाळता येऊ शकतात. ❐

बदल तर निसर्गाचा नियमच आहे फक्त फरक एवढाच आहे, की वेळेनुसार काहींची मने बदलतात तर काहींचे दिवस.

शरीरात कोणतंही सौंदर्य नसतं. सुंदर असतं व्यक्तीचं कर्म, त्याचे विचार, त्याची वाणी, त्याची वागणूक, त्याचे संस्कार....

कविता

# शेतकऱ्याचं पोर

शेतकऱ्याचं पोर हाय मी शेतकऱ्याचं पोर
काट्यांमधल्या वाटा माझ्या जीवाला या घोर.....

शेती-माती-पीक सारं माझं गणगोत
बारमाही मोट चाले पाणी खळाळत.....

हिरवं रान हाय माझी आन-बान-शान
शेतीनं या दिला माझ्या बाले मोठा मान .....

जलम झाला मातीमंधी मले नयी जात
जीवा-शिवा बैल जोडी मले गोंजारत.....

चंद्र, तारा, ग्रह सारा माझ्या वावरात
पिकांमधी डोलू लागे चमके मोत्यागत.....

कायी माती माय माझी राबणारा बाप
दिन रात काम करी नही त्याले माप.....

रात दिन नही त्याचं कष्टायीना जगणं
कष्टाले त्याच्या फय देजो हेच देवा मागणं.....

कवयित्री - सौ. शुभांगी माळी (नाशिक)





भ्रमंती

# सोलापूरचा भुईकोट किल्ला

ब हामनी राज्याचा प्रधान महमूद गवान याने साम्राज्य विस्तारासाठी इसवी सन १४६३ च्या सुमारास हा किल्ला बांधला. हा किल्ला सिध्देश्वर तलावाच्या काठावर वसलेला आहे. येथे दुसरे बाजीराव पेशवे, छत्रपती प्रतापसिंह यांनीही वास्तव्य केले होते. हा किल्ला इतिहासातील अनेक घटनांचा साक्षीदार आहे.

आदिलशहाच्या कन्येला बुऱ्हाण निजामशहाला दिले. त्यांच्या लग्नात विजापूरच्या ताब्यात असलेला हा किल्ला जावयाला हुंडा म्हणून देण्याचे आदिलशाहीने जाहीर केले होते. दोन वेळेस हा किल्ला हुंडा म्हणून देण्यात आला होता.

अतिशय भक्कम तटबंदी असलेल्या या किल्ल्याला २२ बुरुज असून त्यांची एक भरभक्कम साखळीच निर्माण केली आहे. सभोवती साधारण ३० फूट उंचीची तटबंदी असून जागोजागी बुरुजांवर तोफा ठेवण्याची सोय आहे. किल्ल्याच्या तिन्ही बाजूला मोठे खंदक आहेत. त्यामुळे हा किल्ला पूर्णपणे सुरक्षित होता. चौथ्या बाजूला सिध्देश्वर मंदिर आणि तलाव आहे. पुढे पूल पार केल्यावर नागबावडी लागते. किल्ल्याचे पहिले प्रवेशद्वार म्हणजे हत्ती दरवाजा. दरवाजाच्या वर नगारखाना बांधलेला आहे. तेथून प्रवेश केल्यावर पहारेकऱ्यांच्या खोल्या दिसतात. समोरच घोड्याच्या पागा आहेत. पुढे दुसरा दरवाजा आहे. तिथे मोठी मैदानासारखी जागा आहे. शत्रूला आत घेराव घालण्यासाठी या जागेचा उपयोग होत असे. किल्ल्याच्या तिसऱ्या प्रवेशद्वारापाशी लागूनच महाकाळ बुरुज आहे. प्रवेशद्वाराच्या वर एक शिलालेख आहे. त्यात अली आदिलशहा पहिला

याने बाजारपेठ. मशीद, बाग, हौद निर्माण केल्याचा उल्लेख आहे. त्यात सोलापूरचा उल्लेख संदलपूर असा आलेला आहे.

मल्लिकार्जुन मंदिराच्या बाजूला एक वास्तू आहे. तिला बत्तीस खांब असल्याने त्यास बत्तीस खांबी मस्जिद असे म्हटले जाते. येथे नक्षीयुक्त सजावट केलेली असून समोरुन थंड हवा येण्यासाठी फट ठेवलेली आहे. पुढे बुरुजावर जाण्यासाठी पायऱ्या असून तिथे तोफ ठेवण्याची व्यवस्था आहे. शेजारी गोड्या पाण्याची विहीर आहे.

दर्गो पाटील बुरुजाच्या पुढे बाळंतीण विहीर दिसते. दर्गो पाटील घराण्यातील बाळंतिणीला येथे आत्मसमर्पण करावे लागले होते. त्याच्याच कडेला हवेशीर बाल्कनी असलेला चौक लागतो. खाली उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. बाल्कनीच्या एका स्तंभावर परत त्याच रस्त्याने मागे येऊन प्रवेशद्वारापाशी आल्यावर किल्ल्याची एक प्रदक्षिणा पूर्ण होते.

हा किल्ला पुरातत्व खात्याच्या अखत्यारीत असल्याने सकाळी नऊ ते पाच अशी प्रवेशाची वेळ आहे. सोलापुरातील एक उत्तम पर्यटनस्थळ म्हणून येथे अनेक पर्यटक भेटी देतात.

सोलापूर रेल्वे आणि बस स्थानकातून रिक्षाने किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत जाता येते. किल्ल्यात पिण्याचे पाणी किंवा जेवणाची व्यवस्था नाही. ❐

> एकदा देण्याची सवय लावून घेतली, की येणं आपोआप सुरु होतं. मग तो 'मान' असो, 'प्रेम' असो वा 'वेळ' असो...!
>
> आपण आळशी व्हावं, की कर्तृत्ववान व्हावं हे ज्याच्या त्याच्या विचारावरच अवलंबून असतं.




सद्‌गुरुकृपेने आपण अतिशय कमी किमतीत लहान मुलांसाठी मनोरंजनाबरोबरच ज्ञानाचा खजिना उघड केला आहे; त्याबद्दल आपले कौतुक करावे तितके थोडे आहे. १० वी नंतरच्या करीयरच्या वाटा याची गरज आणि माहिती मुलांबरोबर पालकांना सुद्धा हवी असते. ती दिल्याबद्दल आपले धन्यवाद!

शिवाय आपल्या कथा खूपच बोधपर असतात. लहान-लहान मुलांना आपले वाढदिवसाचे फोटो बघून इतका आनंद झालेला असतो, की तो शब्दात सांगणे अवघड आहे. दिव्य वाणीतून आपण सद्‌गुरुदेवांचे विचार अतिशय सोप्या शब्दात मांडता आणि सद्‌गुरुची शिकवण आपण दोन शब्द या संपादकीयमध्ये सुंदर प्रकारे लिहिता. खूप खूप आभार आपले आणि आपल्या टीमचे! दातार कृपा करो, हे अनमोल असे हसती दुनिया मासिक निरंतर आमच्या वाचनात राहो, जेणेकरुन आमच्या ज्ञानात भर पडत राहील.

**- वत्सला निकम, अमरलक्ष्मी (सातारा)**



# हसा मुलांनो हसा





दुकानदार : (नोकराला) अरे रामू, गिऱ्हाईकाला जी वस्तू पाहिजे असेल, ती जर आपल्याकडे नसेल तर याच पध्दतीची दुसरी वस्तू सुचवायची. पण गिऱ्हाईकाला परत पाठवायचं नाही.

गिऱ्हाईक : टिश्यू पेपर आहे का ?

रामू : नाहीये..... पण आमच्याकडे कार्बन पेपर आहे, सँड पेपर आहे. छान आहे. वापरुन बघा.



शिक्षक : बंड्या, पूर्व दिशा कुठे आहे सांग बरं !

बंड्या : आईला विचारुन सांगतो.

शिक्षक : का ? तुला सांगता येत नाही ?

बंड्या : बाबा म्हणतात, आई म्हणेल ती पूर्व दिशा.



गंपू : बाबा, उद्या आपण खूप श्रीमंत होणार.

बाबा : ते कसं काय ?

गंपू : उद्या आमचे गणिताचे शिक्षक पैशांचं रुपांतर रुपयांमध्ये कसं करायचं हे शिकवणार आहेत.



काकू : गण्या, हे घे पन्नास रुपये. चाळीस रुपयांचं दही आण, आणि दहा रुपये ठेव तुला फ्रुटी प्यायला !

गण्या : (थोड्या वेळाने येऊन) काकू ! हे घ्या चाळीस रुपये, दही नाही मिळालं. तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी दहा रुपयाची फ्रूटी प्यायलो.



बन्याची बायको : अहो, घरी पाहुणे येणार आहेत आणि मी फक्त डाळच बनवली आहे. आता काय करायचं ?

बन्या : जेव्हा पाहुणे येतील तेव्हा किचनमध्ये एक रिकामं भांडं मुद्दाम खाली पाड, आणि मी विचारल्यावर सांग, की शाही पनीर सांडलं. मग दुसरं भांडं पाड, आणि मी विचारल्यावर सांग, की पनीर भुर्जी पडली. मग मी सांगेन, जाऊ दे डाळच घेऊन ये...

(पाहुणे आल्यावर भांडं पडायचा आवाज येतो)

बन्या : काय गं काय पडलं ?

बन्याची बायको : अरे देवा, डाळीचं पातेलंच पडलं.



बंटी : पप्पा, तुमच्या डोक्यातले काही केस पांढरे कसे झाले ?

पप्पा : कारण जेव्हा जेव्हा तू मला त्रास देतोस ना, तेव्हा तेव्हा माझा एक केस पांढरा होतो.


बंटी : हं.... आता कळलं आजोबांचे सगळे केस पांढरे का झाले ते !



मंगी : भैया, एक किलो पोहे दो आणि हां, बंद प्याकेटवालेच देना, उघडे बागडे नको.

दुकानदार : भाभीजी, उघडे मैं समझ गया, वो बागडे क्या होता है ?

मंगी : ये जो तुम पोहे पोते में उघडे रखते हैना, तो रात में इसमे उंदीर बागडते है, उसे कहते हैं उघडे बागडे



शिक्षिका : तुम्हाला किती प्रकारचे पापड माहित आहेत ?

दीपा : मॅडम, उडीद पापड, नाचणीचे पापड, बटाटा पापड.....

पिंकी : तीळ पापड !

शिक्षिका : तीळ पापड ? तो कसा असतो ?

पिंकी : माहीत नाही.... माझी आजी नेहमी म्हणायची. मेलीचा तीळ पापड झाला.





कथा

# गुरुआज्ञेचं महत्त्व

काशी नगरीत एक थोर संत राहत होते. ते काबाडकष्ट करुन आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवत असत. रोज संध्याकाळी त्यांच्या प्रांगणात सत्संगाचं आयोजनही होत असे. सत्संग श्रवण करण्यासाठी अनेक भाविक सज्जन येत; परंतु ते कोणाकडून काहीही घेत नसत. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात ते खूपच लोकप्रिय होते.

एके दिवशी त्यांचा एक शिष्य दीनवाणा होत त्यांच्या चरणी प्रार्थना करत म्हणाला, “गुरुदेव, मी नित्यनेमाने सत्संग करतो. साधना करतो; पण तरीही माझ्या जीवनात सुख नाही. मला कामधंदा मिळत नाही. तुम्ही कृपा करा, माझी गरिबी दूर करा. जेणेकरुन मी दोन घास सुखाने खाईन. चार लोकात मला थोडाफार मान मिळेल.”

गुरुदेवांना त्याची दया आली. ते म्हणाले, “येत्या पौर्णिमेला सत्संग समाप्तीनंतर हा कंदिल हातात घेऊन कोणत्याही एका दिशेला जा. कंदिल जिथं विझेल तिथं हातभर खड्डा खण तुला धन मिळेल. त्या धनातून एखादा व्यवसाय सुरु कर आणि काही धन सेवेसाठी खर्च कर; परंतु एक गोष्ट

लक्षात ठेव, तुला फक्त एकदाच जायचं आहे; पुन्हा दुसऱ्या दिशेला जाऊ नकोस, धनाचा मोह फार वाईट असतो."

गुरुदेवांनी सांगितल्याप्रमाणे त्याने दिशा निश्चित केली आणि पौर्णिमेच्या रात्री कंदिल घेऊन निघाला. जिथं कंदिल विझला तिथं त्याने खड्डा खोदला. तिथं चांदीच्या नाण्यांनी भरलेलं मडकं सापडलं. ते घेऊन तो आनंदाने घरी आला. काही दिवस सुखात गेले. मिळालेलं धन हळूहळू खर्च होत गेलं; पण व्यवसाय काही सुरु केला नाही.

एके दिवशी त्याच्या मनात विचार आला, की पुन्हा एकदा कंदिल घेऊन दुसऱ्या दिशेला जावं. कदाचित यापेक्षाही जास्त धन मिळेल. येणाऱ्या पौर्णिमेला तो कंदिल घेऊन दुसऱ्या दिशेला गेला. कंदिल जिथं विझला तिथं खोदून पाहिलं.... आणि काय आश्चर्य! तिथं चक्क सोन्याच्या नाण्यांनी भरलेलं मडकं सापडलं. आता तर ऐशारामात दिवस जाणार. कामधंदा देखील करायची गरज नाही.

पुढे अनेक दिवस त्याने त्या धनावर मौजमजा केली. आता तर तो सत्संगाला जाणंही विसरला होता. दिवसभर चैन करत आरामात लोळत पडायचा. हळूहळू लोभाने त्याच्या मनात जागा घेतली आणि एके दिवशी त्याने ठरवलं, की आपण पुन्हा एकदा तिसऱ्या दिशेला जाऊ. याहीपेक्षा अधिक धनाचा साठा सापडेल. आपण जगातल्या सगळ्या चैनीच्या वस्तू विकत घेऊन आरामात आयुष्य जगू.

पौर्णिमेच्या दिवशी तो तिसऱ्या दिशेला कंदिल घेऊन निघाला. ज्या ठिकाणी त्याचा कंदिल विझला त्या ठिकाणी खणायला सुरुवात केली. अचानक जमीन भुसभुशीत होऊन तो जमिनीखाली खोल अशा गुहेत कोसळला. चाचपडत पुढे जाऊ लागला. तिथे त्याला एक हडकुळा गृहस्थ दिसला. तो मोठ्या कष्टाने दगडी जातं ओढत दळण दळत होता. शिष्याला पाहताच तो म्हणाला, "ये मी तुझीच वाट पाहत होतो." शिष्याला काही कळेना. शिष्य म्हणाला, "तू इथे काय करतोयस?" त्यावर तो म्हणाला,"तू जसा लोभाच्या आहारी जाऊन गुरु आज्ञेचं पालन केलं नाही, तसं मी देखील गुरु आज्ञा मोडून लोभाच्या आहारी गेलो आणि इथे येऊन ही शिक्षा भोगत आहे. जेव्हा मी व्याकूळ होऊन गुरुदेवांना प्रार्थना केली, तेव्हा त्यांनी मला सांगितलं, की तुझ्यासारखाच एखादा लोभी जेव्हा इथं येईल तेव्हा तुझी सुटका होईल. आता हे जातं तू सांभाळ. मी निघतो." असे म्हणून तो निघून गेला. शिष्याच्या हाती आता पश्चातापाशिवाय काही उरलं नव्हतं.

गुरुच्या आज्ञेनुसार जो जीवन जगतो, त्याचंच जीवन सुखमय होतं. ❐

चांगलं कार्य करणारा कधीही मान-सन्मानाची अपेक्षा करत नाही. कारण त्याचं कार्य स्वतःच त्याला सन्मानास पात्र ठरवतं.

- स्वामी विवेकानंद

कोणतीही व्यक्ती या जगामध्ये आपला शत्रू किंवा मित्र नसतो. आपला 'व्यवहार' आणि 'शब्द' हेच लोकांना शत्रू किंवा मित्र बनवत असतात.

- गौतम बुध्द



# रक्षाबंधन

परमेश्वराचे सुंदर गिफ्ट, असते प्रेमळ आई
त्या आईचं दुसरं रुप, म्हणजे आपली ताई... ।।१।।

रक्षाबंधनाच्या दिनी, ताई आपली नटते छान
सर्वांची ती लाडकी म्हणून, तिलाच मिळतो मोठा मान... ।।२।।

लाडक्या आपुल्या बंधूंना ती, बसवून पाटावरी
मोठ्या आनंदाने बांधते, राखी हातावरी... ।।३।।

भावास लाभो दीर्घ आयुष्य, बहीण करीते प्रार्थना
भाऊ देखील तत्पर राहतो, बहिणीच्या रक्षणा... ।।४।।

संदेश देते हातावरची, चमचमणारी राखी
भावाबहिणीच्या प्रेमाची ना, होणार वजाबाकी... ।।५।।

पौर्णिमेचा चंद्र न् सूर्य, आनंदाने गाती
प्रेम आणि बंधुत्वाची, जपू या प्रेमळ नाती... ।।६।।

कवी - परशुराम कारंडे - (मुंबई)



# नामजपाचे महत्त्व



स्वामी विवेकानंदजी एके दिवशी भगवंताच्या नामजपाचे महत्त्व समजावून सांगत होते. श्रोते तल्लीन होऊन ऐकत होते; परंतु मध्येच एका सज्जनाने प्रश्न विचारला, स्वामीजी! भगवंताचं नाव वारंवार का घ्यायचं असतं? शेवटी तोही एक शब्दच आहे ना! मग त्या शब्दाचं पुन: पुन्हा रटन करुन काय साध्य होणार आहे? सारे जण स्वामीजींच्या चेहऱ्याकडे पाहू लागले. स्वामीजी आता यावर काय उत्तर देणार याविषयी त्यांच्या मनात कुतूहल जागे झाले. तेवढ्यात स्वामीजी प्रश्न विचारणाऱ्याला म्हणाले, "तुम्ही मूर्ख आहात." हे वाक्य ऐकताच श्रोत्यांमध्ये चुळबूळ सुरु झाली. सगळ्यांच्या चेहऱ्यावर एकच प्रश्नचिन्ह, स्वामीजी असं कसं बोलू शकतात? ज्याने प्रश्न विचारला होता त्यालाही राहवलं नाही. त्याने विचारले, "स्वामीजी! तुम्ही तर साधू-महात्मा आहात. तुम्हाला तर क्रोध यायलाच नको. मग तुमच्या तोंडामध्ये असा शब्द का आला?" स्वामीजी म्हणाले, "मी तर फक्त शब्द वापरला. तुम्हाला मारहाण तर केली नाही ना? मग एवढं वाईट वाटायला काय झालं?" तेव्हा तो म्हणाला, की तुम्ही 'मूर्ख' शब्द वापरला याचं मला वाईट वाटलं. त्यावर मंदस्मित करत स्वामीजी म्हणाले, "पाहिलंत! मी केवळ एकच शब्द वापरला तर तुमच्या मनाची अवस्था केवढी बदलून गेली! तसं आम्ही देखील भगवंताचा नाम जप जेव्हा करतो तेव्हा आमच्याही मनाची अवस्था बदलून जाते. मनाला प्रसन्नता लाभते. भगवंताची कृपा होते. मनामध्ये शुभभावना निर्माण होतात. सकारात्मकता वाढू लागते. परमशांतीचा अनुभव येतो. एक नकारात्मक शब्द जर तुमच्या मनामध्ये उलथा पालथ निर्माण करत असेल तर मग भगवंताच्या नामाचं उच्चारण किती प्रसन्नता देईल. याचा तुम्हीच विचार करा!"

स्वामीजींच्या या समजवण्याने सर्वांचं समाधान झालं.

❒ संग्राहक - सुकदेव पाटील

# आरोग्यदायी रानभाज्या

मित्रांनो, रानभाज्या नैसर्गिक पध्दतीने उगवलेल्या असल्याने त्या आरोग्यास चांगल्या असतात. म्हणून पावसाळ्यात येणारा हा रानमेवा चुकवू नका बरं!

या भाज्या स्वादिष्ट तर असतातच; पण त्यामध्ये जीवनसत्वे, खनिजे, सूक्ष्म मूलद्रव्ये देखील भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे शरीराला खूप फायदा होतो.

यातील काही भाज्या उष्णधर्मी तर काही थंड असतात. खोकला, सर्दी, ताप, दम्यावर उपचार म्हणून वाकळीसारख्या रानभाज्या आवर्जुन खाल्ल्या पाहिजे. रानकेळ्यांमध्ये खोकला बरा करण्याची क्षमता असते, तर कुडा हा रानपाला पोटदुखीसाठी रामबाण उपाय मानला जातो. कोंब आलेली भारंगी, शेकट्यांच्या भाजीमध्ये प्रोटिन्स भरपूर प्रमाणात असतात. कुळू वा कुवाळूची भाजी ही गवतासारखी असते. शेवळं म्हणजे पांढऱ्या मशरुम्सचाच एक महत्त्वाचा प्रकार. यात सेक्रोमायसिस इस्ट अधिक असते. या भाज्यांमध्ये लोह, खनिजांचा भरपूर साठा असल्याने त्यांचा आस्वाद पावसाळ्यात घ्यायलाच हवा.

## औषधी गुणधर्म :

भारंग, पातेरे, बिंडासारख्या रानभाज्या बिनविषारी व सुरक्षित असतात. ज्या रानभाज्यांच्या पानांचा रंग गडद असतो, त्याची चव थोडीशी तुरट व कडू असते. मात्र, त्यात पौष्टिक गुणधर्म अधिक असतात. या भाज्याही उकडून शिजवल्या जातात. करटुलसारख्या काटेरी फळ असणाऱ्या भाजीमध्ये


आघाडा


आंबाडी


आंबटचुका


भारंगी


चाकवत


घोळ

नैसर्गिक जीवनसत्त्व असल्यामुळे ती पचनास सोपी असतात. आघाडा, माळा, पुर्ननर्वा, कर्डू, मोरंगी, दवणा, काटेसावर, नारई, वागोटी, टाकळा, आंबाडी, भोकर, खडकतेरी, भोवरी यासारख्या भाज्यांमध्ये जस्त(झिंक), तांबे, कॅल्शिअम याचे प्रमाण अधिक असते. भारंगीची भाजी ही नवीन फुटलेल्या कोंबाच्या व पानाच्या स्वरुपात असते. टाकळ्याच्या पानांचा लेप विविध त्वचाविकारांवर लावतात. या भाजीला तखटा असेही म्हणतात. शेवळा खाजरा असतो म्हणून त्यासोबत काकड या वनस्पतीची आंबट फळे घालून भाजी करतात. शेवळाचा कंद अनेक औषधांमध्ये वापरला जातो. रक्तशर्करा नियंत्रित करण्यासाठी करटोली गुणकारी आहेत. या फळभाजीमध्ये खूप बिया असतात. बाफळी हे बी असते आणि कुळीथासारखे चपटे असते. ही भाजी चिरुन उकडून, त्यात हरभऱ्याची डाळ घालून बनवली जाते. या भाजीच्या फळांचे तेलही काढतात. पोटदुखी, जंत होणे यासारख्या त्रासांमध्ये या भाजीचे सेवन करतात. हेळू ही रानभाजी औषधी असते, त्याची पाने कुडाच्या पानापेक्षा लहान असतात. या भाजीला पेरुच्या आकाराची फळेही येतात. या फळांची भाजी केळ्याच्या चवीची लागते. कडमडवेली पांढऱ्या रंगाच्या या वेलीला कोवळे अंकुर येतात. याची पाने जाड असतात. ही भाजी चिंचेपेक्षाही आंबट असते. अधिक प्रमाणात लसूण वापरुन ती बनवली जाते. या भाजीत पोटाचे आजार बरे करण्याची क्षमता आहे. या भाजीतील गुणधर्मामुळे कफविकारही दूर होतात. आघाडा या भाजीमध्ये अ जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात आढळते. ही भाजी पाचक असून मूतखडा, मूळव्याध व पोटदुखीवर गुणकारी आहे. आघाडा रक्तवर्धक आहे व हाडे बळकट होण्यासाठी खाल्ला जातो. या सर्व भाज्या करण्यासाठी अगदी सोप्या आणि खायला रुचकर असतात.

अनेक आजारावर त्या उपयुक्त ठरतात. मधुमेहासारख्या अनेक आजारांच्या रुग्णांना त्या पूरक आहार म्हणून उपयोगी ठरतात. नैसर्गिक वाढलेल्या रानभाज्यांना विशेष चव देखील असते. ❐



गुळवेल



काटवल



तांदुळजा



कपालफोडी



टाकळा



खापरखुटी



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालरा







मी चिंटू, मीना आणि रमेशला फोन करुन बोलवून घेते.
किट्टी, आम्ही सर्वजण आलो. आता चला जाऊया बाहेर
व्वा! ह्या थंडगार वातावरणाची मज्जा पावसात भिजण्यातच आहे
पण मला पावसात भिजायला फार आवडतं.मी तर जाणार
आपण जास्त वेळ पावसात भिजायचं नाही कारण त्यामुळे आपण आजारी पडू शकतो.


चला आपण सर्वांनी कागदाच्या होड्या करुन पाण्यात सोडू या
अरे किट्टी, हे काय करतेस; मी पाण्यात पडेन.
चिंटू पाण्यात पडला, फार मजा आली.


किट्टी, तू हे काय केलंस? मला पाण्यात का पाडलंस?
थांब, मी तुला आता दाखवतो.
अरे हे काय! मी तर पडले
धडाम्!
हा!हा!! किट्टी पाण्यात पडली; फार मजा आली. अरे हे काय? किट्टी तुला तर शिंका यायला लागल्या.
मी तुला पावसात भिजायला मनाई केली होती. तू माझं ऐकलं नाहीस आणि आता पडलीस ना आजारी.



# द्रोणाचार्य पुरस्कार
# मेजर ध्यानचंद पुरस्कार



हा पुरस्कार जास्तीत जास्त खेळ आणि खेळासंबंधित प्रशिक्षण देणाऱ्यांना दिला जातो. याची सुरुवात सन १९८५ साली करण्यात आली. हा पुरस्कार 'द्रोण' या नावावरुन देण्यात येतो. प्राचीन भारताचे संस्कृत महाकाव्य 'महाभारत' यात गुरु द्रोणाचार्य हे एक पात्र होते. कौरव आणि पांडव या राजकुमारांना युध्दकौशल्य, कला आणि दिव्य शस्त्रांचे प्रशिक्षण देण्याकरता आचार्य म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. हा पुरस्कार प्रत्येक वर्षी क्रीडा मंत्रालयाकडून देण्यात येतो. क्रीडा मंत्रालय या पुरस्कारांसाठी निवड समिती बनवते. ज्या व्यक्ती एखाद्या खेळप्रकारांमध्ये वीस वर्ष अथवा त्यापेक्षा अधिक काळ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळाडू घडवण्यामध्ये आपले योगदान देत आहेत; त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले जाते. आतापर्यंत एकूण १०४ प्रशिक्षकांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

गुरु द्रोणाचार्य यांची एक कास्य प्रतिमा, प्रमाणपत्र, औपचारिक पोशाख आणि पाच लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. एका वर्षामध्ये जास्तीत जास्त पाच व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. भालचंद्र भास्कर भागवत (कुस्ती), ओम प्रकाश भारद्वाज (बॉक्सिंग), ओ.एम्. नांबियार (ॲथलेटिक्स) यांना सर्वप्रथम या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## मेजर ध्यानचंद पुरस्कार

मेजर ध्यानचंद पुरस्कार हा भारतातील सर्वोत्तम क्रीडा पुरस्कार आहे. या पुरस्काराने एखाद्या खेळाडूच्या संपूर्ण जीवनाला सन्मानित करण्यात येते. अधिकृतपणे या पुरस्काराचे नाव खेळामध्ये 'जीवन गौरव ध्यानचंद पुरस्कार'असे आहे. या पुरस्काराचे नाव भारताचे प्रसिध्द मैदानी हॉकी खेळाडू 'ध्यानचंद सिंह' (१९०५ ते १९७९) यांच्या नावावरुन ठेवण्यात आले आहे. मंत्रालयाद्वारा संघटित समितीकडून पुरस्कार प्राप्त खेळाडूंची निवड केली जाते. तसेच त्यांच्या खेळामधील व निवृत्तीनंतर अशा दोन्ही कार्यकालामधील योगदानाचा सन्मान केला जातो. आतापर्यंत एकूण ५१ खेळाडूंना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. एक प्रतिमा, प्रमाणपत्र, औपचारिक पोषाख आणि पाच लाख रुपये अशा पध्दतीने या पुरस्काराचे वितरण करण्यात येते. 'शाहूराज बिराजदार '(कुस्ती), 'अशोक दिवान' (हॉकी), 'अपर्णा घोष' (बास्केट बॉल) या खेळाडूंना सर्वप्रथम या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

❒ संग्राहक - नीलेश माने (अंबरनाथ)


# सांगा बाळांनो ....




रानीवनी माझीच वस्ती
खूप चालते माझी मस्ती
या झाडावरुन त्या झाडावर
उड्या मारतो मी भरभर सांगा बाळांनो मी कोण ?......



गावातच मी नेहमी राहतो
घरा-शेताची राखण करतो
रात्री-बेरात्री पहारा देतो
चोरांना पिटाळून लावतो सांगा बाळांनो मी कोण ?......



मेघनादाने आनंदित होतो
पिसारा फुलवून मी नाचतो
पंखावर माझ्या नक्षी काम
पाहून विसरती सारे भान सांगा बाळांनो मी कोण ?......



कपिला असे माझे नाव
गोठ्यामध्ये माझा ठाव
गोमाता म्हणून देती मान
दूध माझे पौष्टिक छान सांगा बाळांनो मी कोण ?......



कविता ही मीच लिहिली
अनेकांनी वहीत उतरवली
परीक्षेत मी मदत करते
खिशातही शोभून दिसते सांगा बाळांनो मी कोण ?......

कवी : श्रीकृष्णदास निरंकारी (गडचिरोली)



# बेनेफिट ऑफ डाऊट

सत्यपूर गावात रामदिन नावाचा एक गृहस्थ राहत होता. तो खूप संशयी होता. त्याच्या घराशेजारीच एक तरुण नवीनच राहायला आला. त्याचे नाव होते आदर्श.

आदर्श पदवीधर होता; पण त्याला अद्याप नोकरी मिळाली नव्हती. त्यामुळे कामाच्या शोधार्थ तो दिवसभर बाहेर फिरत असे आणि सायंकाळी उशिरा घरी परतत असे. त्याला बघून रामदिनला वाटायचं, की हा कोणीतरी वाईट चालीचा तरुण असावा. त्याने आदर्शविषयी नाना प्रकारच्या अफवा पसरवण्यास सुरुवात केली. जो भेटेल त्यास सांगू लागला, की माझ्या शेजारी राहणारा जो तरुण आहे ना, त्याचं नाव तर आदर्श आहे; पण एक नंबरचा भामटा आहे. दिवसभर उनाडक्या करत असतो. रात्रीबेरात्री घरी येतो. गावातील लोकही त्याच्याकडे संशयाच्या नजरेने बघू लागले. या प्रकाराने आदर्श खूपच वैतागला. त्याला समजत नव्हतं, की लोक आपल्यावर विश्वास ठेवायला का तयार नाहीत?

एके दिवशी गावातील सावकाराकडे चोरी झाली. आपसूकच संशयाची सुई आदर्शकडे फिरली. पोलिसांनी संशयीत म्हणून त्याला ताब्यात घेतलं. मात्र चौकशी अंती त्याच्याविरुध्द चोरीचा एकही पुरावा सापडला नाही. त्यामुळे पोलिसांनी त्याला निर्दोष म्हणून सोडले. त्याला रामदिनचा कुटील डाव लक्षात आला. त्याने गावाच्या पंचायतीमध्ये रामदिनची तक्रार केली.

सरपंचानी रामदिनला या विषयी जाब विचारला. त्यावर तो म्हणाला, "हा तरुण दिवसभर बाहेर असतो, म्हणून मला त्याच्याविषयी तसा संशय आला. या तरुणाचं नुकसान करण्याचा माझा हेतू नव्हता."

सरपंच म्हणाले, "तुला जर तसा संशय आला तर तू खात्री करुन घेतली होती का ? आता तू या तरुणाबद्दल जी काही अफवा पसरवली, ते सर्व एका कागदावर लिहून माफीनामा लिही आणि जाताना त्या कागदाचे तुकडे करुन रस्त्यावर फेकून दे. आपण या तक्रारीचा निकाल उद्या देऊ." रामदिनने तसेच केले.

दुसऱ्या दिवशी सरपंचाने सर्व गावकऱ्यांनाही जमा केले.

रामदिनला सांगितले, "आता तू निकाल ऐकण्याआधी काल फेकलेल्या माफीनामाच्या कागदाचे तुकडे गोळा करुन घेऊन ये."

रामदिन म्हणाला, "पण मी ते कागदाचे तुकडे कसे जमा करु ? ते तर हवेने दूरपर्यंत उडून गेले असतील. आता ते शोधायला कुठे जाऊ ?"

सरपंच म्हणाले, "ते कागदाचे तुकडे जसं सर्वदूर पसरले गेले, तसे तू या तरुणाची जी बदनामी केली ती देखील सगळीकडे पसरली. आता कुणा कुणाला जाऊन सांगणार, की हा तरुण निर्दोष आहे म्हणून ? एकदा गेलेली अब्रू पुन्हा भरुन काढता येत नाही. म्हणून कधीही पूर्ण खात्री केल्याशिवाय कोणावर आरोप करु नये, समजलं ?"

रामदिनला आपली चूक लक्षात आली. त्याने पंचायतीसमोर आदर्शची माफी मागितली आणि पुढे असे करणार नाही असे वचनही दिले, आदर्शनेही तितक्याच मोठ्या मनाने रामदिनला माफ केले.

मित्रांनो, कधीही सारासार विचार केल्याशिवाय कोणाबद्दल अंदाज बांधू नये. कारण जसं दिसतं तसं असतच असं नाही. यालाच सद्‌गुरु माताजींनी म्हटलंय 'बेनेफिट ऑफ डाऊट' म्हणजे संशयाचा फायदा देणे. ❒

– रुपाली शिंदे (अंबरनाथ)

❒ प्राजक्ताची फुले गुंफताना दोरासुध्दा रंगीत होतो, गंधीत होतो. त्याप्रमाणे चैतन्यमय माणसात राहिल्याने मन सदैव टवटवीत राहते, प्रत्येक घरात अशी माणसं असावीत ज्यांच्या असण्यानेच त्यांच्या घरातील व त्यांच्या संपर्कात येणाऱ्यांची मनं विवेक-विचारांनी, ज्ञानाच्या अमृतकणांनी भरल्याशिवाय राहणार नाहीत....!

❒ एक दृष्टिहीन सज्जन एका मंदिरात गेला, मंदिरात दर्शन घेत असलेले लोक त्याला बघून म्हणाले, दर्शनाला आलाय, देवाला बघू शकणार का ? तो म्हणाला, काय फरक पडतोय माझा देव तर मला पाहतोय ना...! दृष्टी नाही तर दृष्टिकोन चांगला पाहिजे.



# आता चंद्रावर सेल्युलर नेटवर्क

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आज एकही गोष्ट अशी नाही, जी इंटरनेटवर शोधून सापडणार नाही. संपूर्ण जगाचे दालन आपल्यासमोर खुले झाले आहे. पण आता एवढे सगळे झाल्यानंतर पुढे काय? तर अजून बरेच काही करायचे आहे. म्हणजे असे, की पृथ्वीवर तर इंटरनेट अस्तित्वात आहेच; पण पृथ्वीच्या कक्षेच्या बाहेर चंद्रावरचे काय? जर माणसाला चंद्रावर गेल्यानंतर इंटरनेटचा वापर करावा लागला, तर तो कसा करणार? सध्या नासा याच प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात आहे. त्यासाठी नासा आता चंद्रावर नेटवर्क प्रस्थापित करण्याच्या दिशेने प्रयत्न करत आहे. भारतीय वंशाचे शास्त्रत्र निशांत बात्रा या प्रकल्पासाठी साथ देत आहेत. निशांत बात्रा सध्या नोकियामध्ये चीफ स्ट्रॅटजी अँड टेक्नॉलॉजी ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. फिनलंडमधील एस्पू येथे राहणाऱ्या बात्रा यांना टेलिकम्युनिकेशन क्षेत्रात काम करण्याचा बारा वर्षाचा अनुभव आहे. २०२२ च्या अखेरपर्यंत हा प्रकल्प कार्यान्वित होईल अशी अपेक्षा आहे. त्यादृष्टीने आवश्यक असलेले संशोधन सध्या युध्दपातळीवर नोकिया बेल लॅब्ज येथे सुरु आहे. यासाठी अतिशय आटोपशीर, कमी उर्जेवर चालणारे, एल.टी.ई. (अतिजलद वेग असणारे) नेटवर्क वापरले जाणार आहे. या प्रकल्पासाठी गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये नासाने नोकियाला आपला भागीदार म्हणून निवडले.

नोकिया आणि नासा चंद्रावर 4G नेटवर्क प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. त्यामुळे भविष्यात मानवाला चंद्रावर इंटरनेटचा वापर तर करता येईलच; पण चंद्रावर मानवी उपस्थितीच्या दृष्टीनेही हे महत्त्वाचे ठरणार आहे. यासाठी नोकियाने इंट्युइटिव्ह मशीन्स या कंपनीशी भागीदारी केली आहे. नोकियाच्या चंद्रावर उतरणाऱ्या लँडरमध्ये ग्राऊंडब्रेकिंग नेटवर्क इंटिग्रेट करण्यासाठी आणि चंद्राच्या पृष्ठभागावर ते उतरवण्यासाठी ही कंपनी सहाय्य करणार आहे.

२०२४ मध्ये चंद्रावर पुन्हा एकदा मानवी पाऊल ठेवण्याच्या दृष्टीने अमेरिका प्रयत्नशील आहे. १९६९ मध्ये नील आर्मस्ट्राँग यांच्या चंद्रमोहिमेनंतर मिशन आर्टेमिस नावाने फॉलोअप मोहीम राबवली जाणार आहे. त्यावेळी चंद्रावर मोबाईलचे 4G नेटवर्क असावे, या दृष्टीने अमेरिका आतापासून मोर्चेबांधणी करत आहे. हे साध्य झाल्यास कदाचित चंद्रावर पोचल्यावर माणसाला तेथून पृथ्वीवर फोन करता येईल किंवा रियल टाईम फोटोग्राफही पाठवता येईल.

अर्थात कायदेशीरदृष्ट्या हे कितपत शक्य आहे हेही तपासून पाहिले जाईल. या मोहिमेमध्ये सध्याच्या नियोजनानुसार एक महिला आणि एक कृष्णवर्णीय व्यक्ती असतील आणि त्यांचे चंद्रावर जास्त काळासाठी वास्तव्य असेल. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अमेरिका पुढचे पाऊल उचलण्याचा विचार करत आहे. ते म्हणजे मंगळावर स्वारी.

हे नेटवर्क आवश्यक त्या सर्व डेटा ट्रान्समिशन ॲप्लिकेशनसाठी संचार सुविधा देऊ करणार आहे. चंद्रावर एकदा का नेटवर्क स्थापित झाले, की ते स्वत:च स्वत:ला जलद संदेशवहनासाठी म्हणजेच एल.टी.इ. साठी सज्ज करेल. या ॲप्लिकेशनमध्ये महत्त्वाची कंट्रोल फंक्शन्स, लूनार रोवरचे रिमोट कंट्रोल, एचडी व्हिडिओचे स्ट्रीमिंग आणि नेव्हिगेशन यांचा समावेश आहे. चंद्रावर माणसाला दीर्घकाळ राहता यावे यासाठी हे ॲप्लिकेशन्स गरजेचे आहेत.

चंद्रावर तसेच एकंदर अवकाशात असलेल्या अतितीव्र आणि खडतर वातावरणातही ही लुनार नेटवर्क्स व्यवस्थित काम करु शकतील अशाप्रकारे विकसित केलेली आहेत. नोकियाच्या बेल लॅब्ज ने हाती घेतलेली ही काही पहिलीच मोहिम नाही. याआधीही १९६२ मध्ये बेल लॅब आणि नासाने टेलस्टार वन हा उपग्रह अवकाशात सोडला होता. युरोप आणि उत्तर अमेरिकेत टीव्ही सिग्नल प्रसारित करणे सर्वप्रथम याच उपग्रहामुळे शक्य झाले होते. परत एकदा अवकाशात चमत्कार घडवण्यासाठी जग सज्ज होत आहे. त्याला एका भारतीयाचा हातभार लागतोय ही आपल्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. ❑

# सामान्य ज्ञान



## योग्य पर्याय निवडा



१) 'जागतिक मैत्री दिन' या तारखेला साजरा केला जातो. १३ ऑगस्ट / ३ ऑगस्ट

२) जयनगर कोणत्या शहराचं जुनं नाव आहे ? जयपूर / अजमेर

३) मौर्य साम्राज्याची स्थापना कोणी केली ? सम्राट अशोक / चंद्रगुप्त मौर्य

४) भारतात चलनी नोटा कुठे छापल्या जातात ? नाशिक / मुंबई

५) क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील सर्वात मोठे राज्य कोणते ? मध्य प्रदेश / राजस्थान

६) हत्ती एका वेळेस किती लिटर पाणी पिऊ शकतो ? १४ लीटर / २० लीटर

७) कुत्रा कोणत्या देशाचा राष्ट्रीय प्राणी आहे ? ब्रह्मदेश / आफ्रिका

८) भारतातील कोणतं राज्य इंग्रजांच्या गुलामगिरीत कधीही नव्हतं ? गोवा / शिलाँग

९) चहाचे उत्पादन कोणत्या राज्यात जास्त येतं ? तामिळनाडू / आसाम

१०) महात्मा गांधींना सर्वप्रथम महात्मा कोणी म्हटले ? रवींद्रनाथ टागोर / लाल बहादूर शास्त्री

११) कोणत्या झाडामध्ये लाकूड नसतं ? बांबूच्या / केळीच्या

१२) कोणत्या पक्ष्यांविषयी असं म्हटलं जातं की तो पावसाच्या पहिल्या थेंबाने आपली तहान भागवतो ?
चातक / राजहंस

१३) भारतातील तिन्ही सेनादलांचा प्रमुख कोण असतो ? राष्ट्रपती / प्रधानमंत्री

१४) पतेती हा कोणत्या धर्मियांचा सण असतो ? यहुदी / पारशी

१५) ६ ऑगस्ट रोजी अमेरिकेने या शहरावर बॉम्ब हल्ला केला होता. - हिरोशिमा / बर्लिन

उत्तरे इतरत्र

# अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध पर्याय...


| अभियांत्रिकी क्षेत्र | कौशल्य / कामाची जबाबदारी | नोकरीच्या संधी / उच्चशिक्षण |
|---|---|---|
| यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) | यांत्रीक अभियंते म्हणजेच मेकॅनिकल इंजिनिअर्सनां मशीन आणि त्याचे पार्ट्स, यंत्रसामग्री उत्पादन यंत्रणा Production & Process, थर्मल पॉवर स्टेशन, सौर ऊर्जा, वातानुकुलन आणि रेफ्रिजरेशन (RAC) आणि औद्योगिक अभियांत्रिकी याचे पार्ट्स डिझाईन करणे, ऑपरेट आणि देखभाल करण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. | सरकारी कंपन्या जसे - भेल, सेल, ओ.एन.जी.सी., इ.. तसेच बऱ्याच बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरी मिळत असतात. |
| इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी (Electrical Engineering) | इलेक्ट्रिकल इंजिनिअर विद्युत निर्मिती, वितरण, वीज नियंत्रण आणि इंस्ट्रुमेटेशनचा वापर ज्या औद्योगिक क्षेत्रात होतो तेथे कार्यरत असतात. याचबरोबर जनरेटर, ट्रान्सफॉर्मर, लाईटिंग आणि वायरिंग यासारख्या विजेची निर्मिती आणि वितरणासाठी ते उपकरणांसह कार्य करतात. ऑटोमोबाईल्स, एअरक्राफ्ट, मोटाराइज्ड वाहने आणि उपकरणांसाठी आवश्यक असलेली इलेक्ट्रिक मोटर्स, यंत्रणा तयार करतात. क्षेपणास्त्र आणि अंतरिक्ष कामाचे डिझाईन, विश्लेषण, निर्मिती, विकास, चाचणी करणे इत्यादी जबाबदाऱ्या इलेक्ट्रिकल इंजिनिअर्सला देण्यात येतात. | सरकारी/बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरी मिळतात. जसे- भेल, एन.टी.पी.सी., एच.टी.पी.सी. त्याच बरोबर वीज निर्मिती क्षेत्रात उच्च पदावर कार्य करण्याची संधी मिळते. |
| ऑटोमोबाईल अभियांत्रिकी (Automobile Engineering) | ऑटोमोबाईल इंजिनिअर्स ऑटोमोबाईलची रचना, विकास, दुरुस्ती व उत्पादन यांच्याशी संबंधित कार्य करतात. ते ऑटोमोबाईल डिझाईनर म्हणूनही कार्य करु शकतात. | विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीची संधी |
| न्यूक्लिअर अभियांत्रिकी (Nuclear Engineering) | न्युक्लिअर इंजिनिअर्स न्युक्लिअर एनर्जी आणि रेडीएशन यावर संशोधन करतात. आण्विक वीज प्रकल्प कार्यान्वीत करुन वीज उत्पन्न करणे हे न्युक्लिअर अभियंत्याचे कार्य असते. आण्विक इंधन सायकलवर काम करण्याची संधी मिळते. उत्पादन, हाताळणी आणि आण्विक इंधनाचा वापर, आण्विक उर्जेतून जे टाकाऊ पदार्थांचे उत्सर्जन होते त्याची सुरक्षित विल्हेवाट लावणे अशी महत्त्वपूर्ण कामे करण्याची संधी प्राप्त होते. | BARC / NPCL या सारख्या नामांकित सरकारी आस्थापनेत नोकरी करत देशसेवेची संधी मिळते. |
| इंडस्ट्रीयल अभियांत्रिकी (Industrial Engineering) | इंडस्ट्रीयल इंजिनिअरांना उत्पादन आणि औद्योगिक क्षेत्रात करीअर करण्याची संधी असते. इंडस्ट्रीयल लेआऊटची योजना आखणे, यंत्र आणि साहित्य निवडणे, गुणवत्ता राखणे, वितरण आणि इन्व्हेटरी कंट्रोल हे अभियंते करतात. | उत्पादन आणि औद्योगिक क्षेत्रात राष्ट्रीय / बहुराष्ट्रीय कंपन्यात करीअर करण्याची संधी प्राप्त होते. |



| | | |
|---|---|---|
| मरीन अभियांत्रिकी (Marine Engineering) | नौका / युध्दनौका / जहाज निर्माण करणे, त्याविषयी संशोधन सर्वेक्षण आणि त्यांची देखभाल करणे. नौदलात (नेव्ही) मोठ्या प्रमाणात मरीन इंजिनिअर्सना मागणी आहे. गोदी आणि कार्गो संदर्भातील यंत्रे आणि अवजारांची देखभाल करण्याचे कामही मरिन इंजिनिअर्स करतात. | माझगाव डॉकयार्ड / शिपयार्ड / जहाज बांधणी करणाऱ्या सरकारी/ बहुराष्ट्रीय कंपन्यात नोकरी मिळते. |
| मायनिंग अभियांत्रिकी (Mining Engineering) | जमिनीच्या आतील आणि वरील खाणीची रचना तयार करणे, त्यांची देखभाल करणे या कार्यासाठी मायनिंग इंजिनिअर्सची मागणी मोठ्या प्रमाणात असते. भुपृष्ठावरील सुरुंगाचे आणि माईन शाफ्टचे बांधकाम आणि नियंत्रण करणे या जबाबदाऱ्या मायनिंग इंजिनिअरला पार पाडाव्या लागतात. | सरकारी, निम्न सरकारी तथा खाजगी खनिज उत्पादन कंपनीत नोकरी मिळते. |
| केमिकल अभियांत्रिकी (Chemical Engineering) | रासायनिक अभियंत्यांना भौतिक आणि रासायनिक बदलांपासून निर्माण होणारी उपकरणे, वनस्पती आणि त्यांचे डिझाईन, पर्यवेक्षण, बांधकाम, स्थापना व ऑपरेशन यांच्याशी संबंधीत कामे करावी लागतात. | राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर वैद्यकीय क्षेत्रात आणि औषध निर्मिती कंपन्यांमध्ये करीअरची संधी |
| बायोमेडिकल अभियांत्रिकी (Biomedical Engineering) | मानवी आणि प्राण्यांच्या जीवनातील जैविक दृष्टिकोनातून अभ्यास बायोमेडिकल अभियांत्रिकी मध्ये शिकविला जातो. बायोमेडकिल इंजिनिअर्सने शोधलेल्या उत्पादनांनी औषध क्षेत्रात क्रांती आणली आहे. कृत्रिम अवयव, कृत्रिम अंग, शल्यक्रियेमध्ये लेझर्सचा वापर अशा मानवी जीवांचे आयुष्यमान वाढवणाऱ्या घटकांवर बायोमेडिकल इंजिनिअर कार्य करीत असतो. | कृत्रिम अवयव निर्माण शल्यक्रियेमध्ये लेझर्सचा वापर अशा विविध बायोमेडिकल क्षेत्रात संधी उपलब्ध आहेत. |
| इलेक्ट्रॉनिक & टेलीकम्युनिकेशन अभियांत्रिकी (E & TC Engineering) | इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरांना इलेक्ट्रॉनिक्स घटकांशी संबंधीत क्षेत्रात काम करण्याची संधी प्राप्त होते. इलेक्ट्रॉनिक वस्तुंची डिझाईन करणे, बनविणे, तपासणी करणे, देखभाल करणे.<br>टेलीकम्युनिकेशन यंत्रणेशी निगडीत क्षेत्रात काम करण्याची संधी प्राप्त होते. उदाहरणार्थ रेडीओ, सॅटेलाईट, संवाद माध्यमे, टी.व्ही., रडार, नेव्हीगेशनल कम्युनिकेशन यंत्रे तसेच माहिती आणि प्रसारा संदर्भातील कार्य E & TC इंजिनिअर करत असतात. | मोबाईल कंपन्या / सरकारी अवकाश संशोधन संस्था / वृत्तवाहिन्या अशा अनेक ठिकाणी नोकरीची संधी |
| पर्यावरणीय अभियंते (Environment Engineers) | पाणी, हवा आणि जमीन यांची गुणवत्ता राखण्यासंदर्भातील कामे करण्याची संधी पर्यावरणीय अभियंतांना असते, समुद्रातील तळ ते अवकाशातील वायुंच्या विविध थरांचा अभ्यास. पर्यावरणीय अभियंताना अतिशय विस्तृत असे क्षेत्र असून , इथे करीअर करण्याच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. | विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये इंजीनिअर म्हणून काम करु शकतात. |
| मायक्रोइलेक्ट्रॉनिक अभियांत्रिकी (Micro E & TC Engineering) | इलेक्ट्रॉनिक सर्किटची चाचणी, रचना, विकास, नवीन तंत्रज्ञानाचा इलेक्ट्रॉनिक्समध्ये वापर करुन नावीन्यपूर्ण शोध लावणे. | बऱ्याच बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरी मिळत असतात. |

संगणक क्षेत्र - computer / कृत्रिम विद्वत्ता -AI / खगोल विज्ञान - या क्षेत्रातील करिअरचे उपलब्ध पर्याय येणाऱ्या अंकात बघुयात.

## रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) ३ ऑगस्ट
२) जयपूर
३) चंद्रगुप्त मौर्य
४) नाशिक
५) राजस्थान
६) १४ लीटर
७) ब्रह्मदेश
८) गोवा
९) आसाम
१०) रवींद्रनाथ टागोर
११) केळीच्या
१२) चातक
१३) राष्ट्रपती
१४) पारशी
१५) हिरोशिमा

## शब्दकोडे २२१ चे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ ज | | २ ए | | ३ का | पू | ४ स |
| वा | | ५ को | क | म | | प्टें |
| ६ ह | रि | ण | | ७ गा | लि | ब |
| र | | ती | | र | | र |
| ८ ला | गो | स | | | ९ श्री | |
| ल | | | १० म | हा | न | दी |
| | ११ मा | व | शी | | ग | |
| १२ भी | मा | | १३ द | श | र | थ |

।। तू ही निरंकार ।।

पूर्ण सदगुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी। पूर्ण सदगुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी। पूर्ण सदगुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी।
पूर्ण सदगुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी। पूर्ण सदगुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी।



शंकरराव जाधव
संयोजक, वाई तालुका

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा। घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है। ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा। गुरू की जै जै जो करता है उसकी होती जै जै कार।
उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा। गुरू की पूजा जो करता है उसको पूजे कुल संसार।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

